CMYK

अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, उस्मानाबाद, लातूर, विजापूर, गुलबर्गा, बिदर, बीड

www.surajyadigital.com | सोमवार, दि. १३ मार्च २०२३ | ▸ वर्ष : २१ वे ▸ अंक : १६३ वा किंमत : ५ रुपये ▸ पाने ८

### झोपलेल्या मुलाच्या डोक्यात वडिलाने कुऱ्हाड घातली; माळकवठे येथील घटना

**सोलापूर** : झोपेत असलेल्या तरुण मुलाच्या डोक्यात वडिलाने कुऱ्हाड घालून गंभीर जखमी केले. ही घटना माळकवठे (ता. दक्षिण सोलापूर) येथे रविवारी पहाटेच्या सुमारास घडली.

ओंकार मळसिध्द काळे (वय ३५ रा. माळकवठा) असे जखमींचे नाव आहे. त्याला मंद्रूप येथे प्राथमिक उपचार करून शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. ओंकार काळे हा रात्री जेवण करून घरात झोपला होता. पहाटे एक वाजेच्या सुमारास त्याचे वडील मळसिध्द याने दारूच्या नशेत त्याच्या डोक्यात कुऱ्हाडीने हल्ला केला. अशी नोंद तालुका पोलिसात झाली आहे.

### रंग खेळताना पायावरून बैलगाडी गेल्याने तरुण जखमी

**सोलापूर** : मित्रांसोबत रंग खेळताना पाय घसरून खाली पडल्यानंतर पायावरून बैलगाडीचे चाक केल्याने तरुण जखमी झाला. ही घटना सदर बझार परिसरातील मुर्गीनाला भाजी मंडई जवळ रविवारी दुपारच्या सुमारास घडली. राजू मेघराज पुणेवाले (वय ३५ रा.उत्तर स.बझार,लष्कर) असे जखमींचे नाव आहे. त्याला उत्तरासाठी शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. आज दुपारी ३ वाजेच्या सुमारास तो भाजी मंडई येथे रंगाच्या गाडीसोबत रंग खेळत होता. जमीन ओली असल्याने पाय घसरून तो खाली कोसळला. त्यावेळी बैलगाडी त्याच्या दोन्ही पायावरून गेल्याने तो जखमी झाला. त्याला उपचारासाठी दीपक लंबूवाले (मेहुना) यांनी शासकीय रुग्णालयात दाखल केले. या घटनेची नोंद सदर बाजार पोलिसात झाली आहे.

# आठवलेंनी ‘सुदर्शन चक्र’ सोडले, शिंदे-फडणवीस यांचे टेन्शन वाढले

## इच्छाशक्तीचा श्रीफळ फोडला, कार्यकर्त्यांचाही लागला ‘लळा’

**सुराज्य/विशेष प्रतिनिधी**

**महाराष्ट्राच्या राजकारणातील रिपब्लिकन पक्षाचे मातब्बर नेते- शीघ्र कवी तथा केंद्रीय समाजकल्याण मंत्री रामदास आठवले यांनी रविवारी अचानक राज्याच्या दौऱ्यावर येवून राजकीय सुदर्शन चक्र सोडले. त्यामुळे भल्या भल्या नेत्यांच्या भुवया उंचावल्या गेल्या आहेत, शिवाय शिंदे-फडणवीस सरकारचे टेन्शनही वाढले. आठवलेंना आगामी लोकसभा व विधानसभा निवडणुकांचे वेध लागले आहेत. त्यांनी स्वत:ही निवडणूक लढवण्याची इच्छा बोलून दाखवली. त्यांनी आपली राजकीय माया पुन्हा एकदा शिर्डीवर बोलून दाखवली तसेच इतके दिवस आपण सत्ता उपभोगली. आता कार्यकर्त्यांनाही सत्तेची पदे मिळायला हवीत, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली. राज्यात लोकसभेला ३, विधानसभेला १५ जागांसह काही महामंडळे भाजप-शिवसेनेने (शिंदे गट) द्यावीत, अशी डिमांडही त्यांनी केली आहे.**

राज्याच्या राजकारणात आठवलेंची मोठी ताकत आहे. त्यांना मानणारा मोठा वर्गही आहे. मनात आले तर ते सत्तेची गणिते पालटू शकतात. त्यांची ताकत लक्षात घेवून भाजप श्रेष्ठींनी त्यांना जवळ केलेच शिवाय देशात आणि राज्याच्या राजकारणात त्यांचा फायदा घेतला, हा इतिहास कुणीच नाकारू शकणार नाहीत. त्याची बक्षिसी म्हणून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी त्यांना राज्यसभेवर घेवून केंद्रीय मंत्रीपदही दिले. राजकीय महत्वाकांक्षा कधी संपत नसते. त्याला आठवले हे कसे अपवाद असू शकतात? त्यांना आगामी निवडणुका खुणावत आहेत.

रविवारी शिर्डीच्या दौऱ्यावर आल्यानंतर आठवलेंनी प्रेस घेतली. नेहमीसारखीच ही प्रेस असेल, असे पत्रकारांना वाटले होते परंतु आठवलेंनी राजकीय सुदर्शन चक्र फिरवून पत्रकारांनाही चकीत करून सोडले. पुन्हा लोकसभा लढण्याची इच्छा त्यांनी बोलून दाखवली. मी शिर्डी लोकसभा मतदारसंघात पराभूत झालो. मात्र मला पुन्हा लोकसभा लढवण्याची इच्छा आहे. भाजपच्या नेत्यांनी विश्वास दाखवला तर मी शिर्डी लोकसभा लढणार असून मतदारसंघाच्या विकासासाठी नक्कीच प्रयत्न करेन, असे आठवले म्हणाले.



### सरकार व खासदाराची डोकेदुखी वाढली

अर्थसंकल्प मांडल्यानंतर शिंदे-फडणवीस हे राज्याचा दौरा करत असून आपल्या सरकारने उत्तम बजेट मांडल्याचा आनंद ते व्यक्त करत असतानाच आठवलेंच्या या मागणीने अचानक दोघांचेही टेन्शन वाढले. केंद्रात भाजप आणि रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आठवले गटाची युती आहे तसेच राज्यात भाजप आणि शिवसेना (शिंदे गट) यांची युती असून खासदार लोखंडे युतीकडून विद्यमान खासदार आहे. आठवलेंच्या जागांच्या मागणीने आगामी लोकसभेत तिकीट वाटपावरून पक्षश्रेष्ठींपुढे मोठा पेच निर्माण होण्याची शक्यता आहे. मात्र आठवलेंच्या इच्छेने विद्यमान खासदार सदाशिव लोखंडे यांचीही डोकेदुखी वाढणार असल्याची चर्चा आहे.

---

शिर्डीत रिपब्लिकन पक्षाचे भव्य अधिवेशन होणार असून मुख्यमंत्र्यांसह अनेक नेते उपस्थित राहणार आहेत. नागालँड सारख्या प्रदेशात रिपाईंचे आमदार निवडून आलेत. महाराष्ट्रात का निवडून येऊ शकत नाही यावर विचार मंथन होणार आहे. मला एकट्याला मंत्री करून मी समाधानी नाही. पक्षातील इतरांनाही संधी मिळावी. दोन ते तीन महामंडळे मिळावी, असा प्रस्ताव सरकार पुढे ठेवला असल्याचे आठवलेंनी सांगितले. मंत्रीमंडळ विस्तार लवकरात लवकर व्हावा. आरपीआयला एक मंत्रीपद दिले जावे. राज्यपाल नियुक्त आमदारात आरपीआयला एक जागा मिळावी. महाराष्ट्रात एकट्याच्या बळावर निवडून येणे अशक्य आहे. मित्र पक्षाने आम्हाला सहकार्य करावे,असे आवाहनही त्यांनी केले.

### राज यांना डिवचले, ठाकरे- राऊतांना दिले टोले

राज ठाकरे यांचे फडणवीस आणि शिंदे यांच्याशी चांगले संबंध आहेत मात्र राज यांची आमच्या युतीला गरज नाही असे म्हणून आठवलेंनी राज यांना डिवचले. महाराष्ट्रात सत्ता बदल झाल्यापासून राज ठाकरे आणि एकनाथ शिंदे तसंच उपमुख्यमंत्री देवेंद फडणवीस हे अनेकदा एकाच मंचावर दिसले आहेत. या तिघांचेही परस्पर संबंध खूप चांगले आहेत. महापालिका निवडणुका तिन्ही पक्ष सोबत लढणार असल्याचीही चर्चा आहे. अशात आता आठवलेंच्या वक्तव्यामुळे युतीतही बिघाडी होते की काय? हे येत्या काळात पहायला मिळेल.शिवसेनेत जी उभी फूट पडली त्या फुटीला उद्धव ठाकरे आणि संजय राऊत हे दोन्ही नेते जबाबदार आहेत. त्यांनी आमची साथ सोडली आणि काँग्रेस राष्ट्रवादीसोबत गेले त्यामुळे ही सगळी परिस्थिती निर्माण झाल्याचा टोला त्यांनी लगावला.

### रंग खेळण्यास पत्नीचा नकार; पतीचा आत्महत्येचा प्रयत्न

**सोलापूर** : रंग खेळण्यास पत्नीने नकार दिला.त्यामुळे पतीने रागाच्या भरात गळफास घेऊन आत्महत्येचा प्रयत्न केला. ही घटना शहरातील गोंधळीवस्ती परिसरातील एस.एस.कॉलनी येथे रविवारी सकाळच्या सुमारास घडली.त्याला बेशुध्द अवस्थेत शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले.

संतोष गायकवाड (वय ३५ रा.सेटलमेंट फ्री कॉलनी, सध्या रा.गोंधळी वस्ती एस. एस.कॉलनी) असे जखमीचे नाव आहे. आज सकाळी ९ वाजेच्या सुमारास संतोष गायकवाड हा पत्नीला रंग लावण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी पत्नी सुखदेवी हिने मला रंग खेळणे आवडत नाही. असे सांगितली.

त्यावेळी रागाच्या भरात संतोष याने घरातील छताच्या लाकडी वाशाला ओढणीच्या सहाय्याने गळफास घेतला होता.हा प्रकार निदर्शनास येताच पत्नी सुखदेवी हिने चाकूने ओढणी कापली. आणि पतीची फासातून सुटका करीत त्याला उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल केले.या घटनेची नोंद एमआयडीसी पोलिसात झाली आहे.

## समलैंगिक विवाहाला केंद्र सरकारचा नकार

### आजच्या सुनावणीकडे देशाचे लक्ष

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था**

देशाच्या कौटुंबिक क्षेत्रात चर्चेचा विषय ठरलेल्या समलैंगिक विवाहाला मान्यता मिळावी म्हणून गेल्या अनेक वर्षांपासून प्रयत्न सुरू आहेत. हे प्रकरण सध्या सर्वोच्च न्यायालयात गेले आहे. याप्रकरणी सुनावणी सुरू असतानाच केंद्र सरकारने अशा विवाहाला मान्यता देण्यास नकार दर्शवला आहे.

भारतीय समाजसंस्कृतीनुसार स्त्री-पुरुषांच्या नात्यालाच मान्यता देता येऊ शकते, असे केंद्र सरकारने न्यायालयात दाखल केलेल्या शपथपत्रात म्हटले आहे. याप्रकरणी सोमवारी न्यायालयात सुनावणी होणार आहे. मुख्य न्यायाधीश डी.वाय. चंद्रचूड आणि न्यायमूर्ती पीएस नरसिंहा आणि जेबी पारदीवाला यांच्या खंडपीठात ही सुनावणी होईल.

२०१८ साली सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार समलैंगिक संबंधांना गुन्हेगारी कक्षातून बाहेर काढण्यात आले होते. मात्र, या संबंधांना गुन्हेगारी कक्षातून बाहेर काढले असले तरीही या विवाहाला मान्यता देता येऊ शकत नाही. कारण, समलैंगिक विवाह निसर्गाच्या विरोधातील विवाह आहे. स्त्री-पुरुषाच्या विवाहालाच आपल्या इतिहासात स्थान आहे, असे सरकारने आपल्या शपथपत्रात म्हटले आहे. समलैंगिक विवाहाला मान्यता मिळावी म्हणून देशातील विविध न्यायालयात याचिका दाखल करण्यात आल्या आहेत. या सर्व याचिकांचे एकत्रिकरण करण्यात आले असून सर्वोच्च न्यायालयात याप्रकरणी सुनावणी सुरू आहे. या सुनावणीदरम्यानच, केंद्र सरकारने या विवाहाबाबत भूमिका स्पष्ट केली आहे. लिव्ह इन रिलेशनशिपसह देशात विविध संबंध अस्तित्त्वात आहेत. आजही अनेक समलैंगिक जोडपे लिव्ह इनमध्ये राहत आहेत. परंतु, आपण फक्त हेट्रोसेक्सुअल फॉर्मलाच मान्यता देऊ शकतो, असे या शपथपत्रात म्हटले आहे.

स्त्री-पुरुषांचा विवाह सामाजिक, सांस्कृतिक आणि कायदेशीररित्या अंतर्भूत आहे. त्यामुळे ही संकल्पना बदलू नये किंवा भारतीय कुटुंब व्यवस्थेचे महत्त्व कमी करू नये असे केंद्राने स्पष्ट केले आहे.

### मोहोळ पोलिसांनी पकडला १५ लाख चंदनासह ३१ लाखांचा मुद्देमाल

**सुराज्य/मोहोळ**

मोहोळ पोलिसांनी १५ लाख रुपये किमतीचे ३०७ किलो चंदन व १६ लाख रुपयांचा टेम्पो असा ३१ लाखाचा मुद्देमाल जप्त केला परंतु पोलिसांच्याच अंगावर टेम्पो घालण्याचा प्रयत्न करून टेम्पो सोडून आरोपी पळून जाण्यात यशस्वी झाले .

मोहोळ पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार मूळ पोलीस ठाण्यात डीबी पथकातील पोलीस नाईक प्रवीण साठे यांना वाफळे गावातून भारत बेझ कंपनीचा एम एच ०४ /जीएफ १९८८या टेम्पोतून श्रीकृष्ण उर्फ बिनू दाडे , शंकर दाडे व त्यांचा ड्रायव्हर विनोद खडूळ हे चंदन विक्रीसाठी घेऊन जाणार असल्याची बातमी मिळाली.

यानुसार डी बी त्यानुसार सोलापूर पुणे महामार्गावर देवडी फाट्याजवळ वाफळे गावाकडे जाणाऱ्या रोडवर पहाटे पोलीस नाईक अमोल घोळवे पोलिस अमलदार सिध्दू मोरे व चालक अमलदार हरी आदलिंगे हे रोडवर सापळा लावून थांबले होते पहाटे पावणेचार वाजणेच्या सुमारास वाफळे रोडने चार चाकी वाहन येताना दिसले.

त्यानुसार पोलिसांनी सदर वाहन थांववण्याचा इशारा केला पोलिस वाहनाचे दोन्ही दिवे त्यावेळेस लावले पोलिसाची गाडी पाहून टेम्पो चालकाने त्याच्या ताब्यातील टेम्पो भरधाव वेगाने वेडेवाकडे चालवून रस्त्यावरील पोलिस कर्मचारी यांना जिवे ठार मारण्याच्या उद्देशाने अंगावर घातले पोलिसांनी आपला जिव वाचवण्यासाठी रस्त्याच्या कडेला उडया मारल्या. त्यांना किरकोळ मार लागला.

पोलिसांनी लगेच त्या वाहनाचा पाठलाग सुरु केला. चंदन तस्करांनी त्यांचे वाहन तेलंग वाडी गावाकडे जाणाऱ्या कच्च्या रोडला घातले. आणि गाडी थाबवून अंधाराचा फायदा घेवून ते पळून गेले . सदर भारत बेंझ टेम्पो क्र एम एच ०४/जी एफ १९८८ मध्ये १३ प्लास्टीक पोत्यात १५ लाख ३८ हजार ७५० रुपये बाजार मुल्य असलेले ३०७ किलो चंदन तसेच १६ लाख रुपये किमतीचा भारत बेझ कंपनीचा टेम्पो क्र एम एच ०४ जी एफ १९८८ असा एकूण ३१३८७५० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.



**सोलापूर सप्तरंगात न्हावून गेले...**सोलापूरसह जिल्ह्यात रंगपंचमीचा सण उत्साहाने साजरा करण्यात आला.

### पंढरीत जागेच्या वादातून कोयत्याने हल्ला; चौघांविरुद्ध गुन्हा दाखल

**सुराज्य/सोलापूर**

गोपाळपूर येथील जागा आम्हाला का देत नाही. या कारणावरून कोयता आणि लाथाबुक्क्याने केलेल्या मारहाणीत एक जण गंभीर जखमी झाला. ही घटना शनिवारी सकाळच्या सुमारास पंढरपूर येथील कुष्ठरोग वसाहत येथे घडली. या प्रकरणात पंढरपूर शहरच्या पोलिसांनी चौघाविरुध्द गुन्हा दाखल केला आहे. प्रसाद नंदकुमार विधाते (वय ४२ रा. गोपाळपूर ता.पंढरपूर) असे जखमीचे नाव आहे. त्यांनी दिलेल्या फिर्यादीवरून अमोल बोडके त्याचा भाऊ राहुल औदुंबर बोडके, प्रवीण बडदे आणि लखन औदुंबर बोडके (सर्व रा.पंढरपूर या चौघाविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला. जखमी विधाते हे काल सकाळी पंढरपूर येथील मंगळवेढा रोड वरून निघाले होते. कुष्ठरोग वसाहत जवळ त्यांना अडवून गोपाळपूर येथील जागा आम्हाला का देत नाही. असे म्हणत लखन बोडके याने त्यांच्यावर कोयत्याने डोक्यावर हल्ला केला. तर इतरांनी मारहाण करून त्यांना धमकी दिली. अशी नोंद पोलिसात झाली.

### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे




हॅलो, माझा मोबाईल ‘फेस अनलॉक’ होत नाहीये!

## बागल भाजपच्या वाटेवर, विखेंच्या साक्षीने दिले संकेत

**सुराज्य/सोलापूर**

सोलापूरच्या साखर कारखानदारीत सतत चर्चेत असणाऱ्या करमाळ्यातील आदिनाथ सहकारी साखर कारखान्यातील राजकीय समीकरणे बदलत असल्याचे चित्र रविवारी पार पडलेल्या एका सोहळ्यात दिसून आले. सत्ताधारी बागल गट भाजपच्या वाटेवर असल्याचे संकेत यातून मिळाले.

पालक मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांच्या उपस्थितीत स्व.दिगंबर बागल यांच्या स्मृती निमित्त झालेल्या एका कार्यक्रमाला भाजप नेत्यांची खास उपस्थिती होती.विशेष म्हणजे आदिनाथ सहकारी तत्वावर सुरू करण्यासाठी मदत केलेले आरोग्य मंत्री तानाजी सावंत



व माजी आमदार नारायणआबा पाटील यांची अनुपस्थिती दिसून आली.करमाळा येथे ९ मार्चपासून (कै.) दिगंबरराव बागल कृषी महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. कृषी महोत्सवाच्या कार्यक्रम पत्रिकेतील भाजप नेत्यांची नावे आणि त्यांनी कार्यक्रमाला लावलेली उपस्थिती पाहता बागल भाजपच्या वाटेवर असल्याची जोरदार चर्चा करमाळ्यात रंगली आहे. विशेष म्हणजे एका नेत्याने थेट पक्षात प्रवेश करण्याचे आवतानच बागलांना दिले आहे.

विधानसभेच्या २०१९ च्या निवडणुकीनंतर आपण नेमके कोणत्या पक्षाबरोबर आहोत, याचा थांगपत्ता अद्यापपर्यंत बागल गटाने कुणालाही लागू दिला नाही. शिवसेनेत फूट पडल्यानंतरसुद्धा आपण कोणत्या शिवसेनेबरोबर आहोत, याचाही अंदाज त्यांनी कोणाला येऊ दिला नव्हता. मागील विधानसभा निवडणूक शिवसेनेकडून लढल्यानंतरही झालेला पराभव लक्षात घेऊन बागल गटाने अतिशय सावध पवित्रा घेतला.

राज्यात महाविकास आघाडीचे सरकार आल्यानंतर प्राप्त परिस्थितीनुसार बागल गटाने राष्ट्रवादी काँग्रेस, काँग्रेस, शिवसेना या सर्वांबरोबरच सलोख्याचे संबंध ठेवण्याचा प्रयत्न केला होता. राज्यात सत्तांतर झाल्यानंतर मात्र त्यांनी भाजपशी जवळीक साधण्यास सुरुवात केली आहे. काही दिवसांपूर्वी मकाई साखर कारखान्याचे अध्यक्ष दिग्विजय बागल यांनी टेंभुर्णी येथे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली होती. रश्मी बागल यांनीही भाजप नेत्यांच्या भेटी घेतल्याची चर्चा होती.

### हात जोडले...

प्रास्ताविक करताना मकाईचे अध्यक्ष दिग्विजय बागल यांनी पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, माजी मंत्री हर्षवर्धन पाटील यांच्याकडे हात जोडून कारखान्यांना मदत करण्याची विनंती केली. बागल गटाच्या कारखान्यासमोरील अडचणी पाहता आणि तालुक्यातील राजकीय परिस्थिती विचारात घेता बागल लवकरच भाजपमध्ये प्रवेश करतील, अशी जाणकारांमध्ये चर्चा सुरू आहे. कृषी महोत्सवाच्या कार्यक्रम पत्रिकेत तानाजी सावंत यांचे कोठेही नाव दिसून आले नाही, त्यामुळे सावंत यांच्या माध्यमातून बागल गटाच्या नेत्या रश्मी बागल शिंदे गटात प्रवेश करणार असल्याच्या चर्चेला पूर्णविराम मिळाला आहे.

CMYK

## लालपरीची उपेक्षा...

शिंदे-फडणवीस यांच्या सरकारने यंदाच्या बजेटमधून राज्यातील कुठल्या कुठल्या घटकांना काय काय दिले? त्याबाबतची माहिती आजा उजेडात येऊ लागली आहे. राज्याच्या प्रवाशांची जीवनवाहिनी म्हणून जिच्याकडे पाहिले जाते, त्या लालपरी म्हणजेच एसटी महामंडळ उपेक्षितच राहिले आहे. एसटी पुन्हा एकदा चर्चेत आली आहे, ती यंदाच्या अर्थसंकल्पात महिलांसाठी निम्म्या दरात एसटी प्रवासाची सुविधा दिल्यामुळे. पण प्रवाशांना झालेल्या या फायद्याव्यतिरिक्त एसटी महामंडळ, वेतनवाढीसाठी अलीकडेच मोठा संप करणारे कर्मचारी यांच्या वाट्याला मात्र फारसे काहीच आलेले नाही, अशी तक्रार पुढे येतेय. अर्थसंकल्पात शिंदे-फडणवीस सरकारने अनेक गोष्टींची खैरात केली. महिला, ज्येष्ठ नागरिकांसोबत, अनेक संस्थांचे कर्मचारी व शेतकऱ्यांसाठीही अनेक महत्त्वाच्या घोषणा अर्थसंकल्पातून करण्यात आल्या आहेत. मात्र, अर्थसंकल्पात महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाला किंवा त्यांच्या कर्मचाऱ्यांना काहीच मिळालेले नाही. दुर्दैवाने लालपरीबरोबरच तिच्या सेवकांची झोळीदेखील रिकामीच राहिली आहे. राज्याच्या सन २३-२४ च्या अर्थसंकल्पात महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाला काहीच मिळाले नसून स्थानक नूतनीकरण, इलेक्ट्रिक बस आणि जुन्या गाड्यांचे एल.एन.जी.मध्ये रूपांतर या जुन्याच योजना असून त्याच योजनांची पुन्हा फक्त उजळणी करण्यात आली आहे. कोरोना महासाथीच्या परिणामामुळे सगळेच उद्योगधंदे अडचणीत सापडले होते. त्याला एसटी महामंडळसुद्धा अपवाद नव्हते. आधीच आर्थिक गर्तेत सापडलेल्या एसटीला कोरोनाची महाभयंकर साथ व त्यानंतर कर्मचाऱ्यांच्या दीर्घकालीन संपामुळे आर्थिक विनाशाच्या खाईत लोटले होते. संकटात सापडलेल्या सर्वसामान्यांच्या या लालपरीला अखेरची घरघर लागते की काय, अशी परिस्थिती होती. एसटीचे उत्पन्न १२ ते १३ कोटी रुपये इतके नीचांकी पोहोचले होते.



परंतु, याच एसटीने या गोष्टीकडे संधी म्हणून पाहिले. उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक शेखर चन्ने यांच्या पुढाकाराने एसटीच्या सर्व कर्मचारी व अधिकाऱ्यांनी कंबर कसली. योग्य नियोजन केले, खूप परिश्रम घेतले. त्यानंतरच्या काळात ७५ वर्षांवरील वृद्धांना मोफत प्रवास योजना राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सरकारच्या वतीने जाहीर केली. ही योजना एसटीसाठी संजीवनी ठरली, असे म्हटले तरी वावगे ठरणार नाही. अमृतमहोत्सवी ज्येष्ठ नागरिक प्रवासी हळूहळू एसटीकडे वळले. त्याचा सकारात्मक परिणाम दिसू लागला आणि बघता बघता एसटीचे दैनंदिन उत्पन्न १३ कोटींवरून २० कोटींपर्यंत पोहोचले. काही वेळा तर हेच उत्पन्न चक्क २३ ते २५ कोटी रुपये इतके झाले होते. एसटीपासून दुरावलेला प्रवासी पुन्हा एसटीकडे पूर्वीसारखाच आकर्षित होऊ लागला. केवळ सात-आठ महिन्यांत एसटीची प्रवासी संख्या २५ लाखांवरून ५० लाखांच्या घरात गेली. पण हे सर्व एसटी सक्षम करण्यासाठी पुरेसे नाही. कारण गेल्या २० वर्षांत एसटी कधीही नफ्यात आलेली नव्हती. एसटीचे प्रतिदिन उत्पन्न २०-२२ कोटी रुपये इतके सीमित झाले आहे. त्यात वाढ होईल अशी स्थिती नाही. त्याला जुन्या गाड्यांसह अनेक कारणे आहेत. सध्या एसटीचे दिवसाला १२ कोटी रुपये वेतनावर खर्च होतात. ११ कोटी ५५ लाख रुपये इंधनावर खर्च होतात. दीड ते दोन कोटी रुपये स्पेअर पार्ट्सवर खर्च होतात. दिवसाला साधारण २५ कोटी रुपये इतका एकूण खर्च आहे. म्हणजेच दररोज ३ ते ५ कोटी रुपये इतकी रक्कम खर्चाला कमी पडते. एसटीची स्थापना ही फायद्या-तोट्याचा विचार करून झालेली नाही. म्हणून अर्थसंकल्पात एसटीला चांगली मदत मिळणे आवश्यक होते, पण दुर्दैवाने तसे झालेले नाही. राज्य सरकार एसटीला कायम सापत्न वागणूक देत आहे. एसटी महामंडळाला मोठ्या भरीव निधीची गरज आहे. महामंडळ ऊर्जितावस्थेत आणण्यासाठी एसटीला स्वमालकीच्या नव्या गाड्या खरेदी करण्यासाठी मोठ्या निधीची गरज आहे. असे असताना, त्याकडे या अर्थसंकल्पात पूर्णत: दुर्लक्ष करण्यात आले आहे. बस स्थानक नूतनीकरण, चार्जिंग स्टेशन, ५,१५० इलेक्ट्रिक बस खरेदी, ५ हजार जुन्या वाहनांचे एल.एन.जी.मध्ये रूपांतर या जुन्याच योजना आणण्याची घोषणा पुन्हा एकदा करण्यात आली आहे. यातून महामंडळ सक्षम होणार नाही. कारण स्थानक नूतनीकरण व नवीन गाड्या खरेदी करणे ही मोठी आव्हाने एसटीसमोर उभी आहेत. एकूण १५,६६३ गाड्यांपैकी ६० टक्के गाड्यांनी साडेदहा लाख किलोमीटर एवढे अंतर कापले आहे. त्या दहा वर्षांपेक्षा जास्त जुन्या झाल्या आहेत. या गाड्या वापरातून तातडीने बाद केल्या पाहिजेत. अशा गाड्या वापरात ठेवून उत्पन्नवाढ होणे कदापि शक्य नाही.या सरकारने महिलांना प्रवासाची ५० टक्के सूट देऊन राजकारण केले. मतांची व्होट बँक तयार केली पण एसटीसाठी काय देऊ असे वाटले नाही. जीव वाहून नेणाऱ्या जिवाची पर्वा केलेली नाही. सरकारने याचा विचार केला पाहिजे.

अध्यात्म


## संत एकनाथांचे महात्म्य सांगणारी : नाथषष्ठी

**आज नाथषष्ठी. संत एकनाथ महाराजांनी ज्या दिवशी समाधी घेतली तो फाल्गुन वद्य षष्ठी हा दिवस 'नाथषष्ठी' म्हणून ओळखला जातो. या दिवशी पैठण या गावी समाधी उत्सव होतो. त्यावेळी भरणाऱ्या यात्रेला लाखोंचा जनसमुदाय नाथांच्या समाधीच्या दर्शनाला येतो.**

संत एकनाथांचा जन्म एका खानदानी देशस्थ ब्राह्मणांच्या घरात १५३३ मध्ये पैठणात झाला. त्यांच्या आईचे नाव रूक्मिणी व वडिलांचे नाव सूर्यनारायण होते. एकनाथजी महाराज हे गुरूंचे निस्सीम भक्त होते. ते तान्हे मूल असताना त्यांचे आईवडील देवाघरी निघून गेले आणि त्याचे पालनपोषण त्यांचे आजोबा श्रीचक्रपाणीजी यांनी केले. एकनाथ हे लहानपणापासूनच अत्यंत हुशार आणि एकनिष्ठ होते. संध्याकाळचे हरी-भजन, पुराण श्रवण, देवपूजा इतर धार्मिक कार्यांची त्यांना आवड होती. परमानंदात ते कधी कधी हातात करताल किंवा वीणा घेऊन भजन म्हणत. कुठलाही दगड समोर ठेवून त्याला फुले वाहायची, कधी देवाचे नामस्मरण करत नाचायचे. गावात श्रीमद्भागवत कथा असताना ते भक्तिभावाने ऐकत असत. एवढ्या लहान वयातही ते त्रिकाल संध्या-वंदन करायला विसरत नसत.

स्तोत्र पठण, सकाळ संध्याकाळ देवाची व गुरुंची पूजा करणे यात ते मग्न असायचे. परिणामस्वरुप भगवंताच्या प्रेमाच्या रसाने भिजलेल्या त्यांच्या जीवनात भगवंताचे खरे रूप जाणून घेण्याची जिज्ञासा निर्माण झाली. त्यांच्या बालमनात हा विचार वारंवार येऊ लागला की ज्याप्रकारे ध्रुव आणि प्रल्हादला ईश्वरप्राप्तीसाठी मदत करणारे सद्गुरु नारदजी भेटले तसे समर्थ सद्गुरु मला कधी मिळणार?

एके दिवशी १२ वर्षांचे एकनाथ शिवालयात हरिगुण गात बसले होते आणि रात्रीच्या चौथ्या प्रहराच्या प्रारंभी त्यांच्या हृदयातून आवाज आला की, 'देवगडात जनार्दन पंत या नावाचे एक भला माणूस राहतात. त्याच्याकडे जा, ते तुला आशीर्वाद देतील. एकनाथ देवगडला गेले, तेथे त्यांना श्री जनार्दन पंतांचे दर्शन झाले. एकनाथजींनी



गुरूंच्या चरणी स्वत:ला अर्पण केले.

तेव्हापासून गुरुद्वारात राहून एकनाथजी गुरूंच्या सेवेत मग्न झाले. गुरू जागे होण्यापूर्वीच ते उठून बसत असे. जी काही सेवा समोर दिसत होती, ती त्यांनी परवानगीशिवाय केली असती. रात्री गुरुजींचे पाय दाबून कधी कधी पंखा उजळायचे. गुरुजी जेव्हा समाधी घेत असत तेव्हा ते दारात उभा असायचे. गुरुदेवांच्या समाधीत कोणत्याही प्रकारची अडचण होऊ नये हे ध्यानात ठेवायचे.

गुरुजींचे इतरही अनेक सेवक होते, पण एकनाथजी कोणाची वाट पाहत नव्हते, ते स्वतः मोठ्या प्रेमाने, उत्साहाने आणि तत्परतेने सेवेत गुंतले होते. त्यांच्यासाठी गुरुजींचे समाधान हे आत्मसमाधान होते, गुरुजींचे वचन शास्त्र होते, गुरुद्वारा नंदनवन होते आणि गुरु आराध्य दैवत होते. गुरुसाक्षात् परब्रह्मावर त्यांची गाढ श्रद्धा होती. अखंड सहा वर्षांच्या सेवेने प्रसन्न होऊन एके दिवशी गुरुजींनी त्यांना अनुष्ठान करण्याची परवानगी दिली. आज्ञा घेऊन एकनाथ हे अनुष्ठान करु लागले.

एके दिवशी एकनाथजी समाधीत असताना एक भयंकर काळा साप त्याच्या अंगाभोवती गुंडाळला. एकनाथजींच्या छायेखाली आपल्या हिंसक भावना विसरून साप डोक्यावर डोलायला लागला. तो साप एकनाथजींचा साथीदार झाला. तो रोज एकनाथजींकडे येऊ लागला. समाधी करताना अंगाला मिठी मारून मस्तकावर फणा पसरून डोलायला सुरुवात करायचा आणि समाधीतून जागा होताच निघून जायचा. पण एकनाथजींना याची माहिती नव्हती. एके दिवशी एकनाथजींसाठी दूध घेऊन आलेला शेतकरी एकनाथजींभोवती साप गुंडाळेला पाहून ओरडला. तेव्हाच एकनाथजींची समाधी तुटली आणि मग ते उठले आणि सापही दूर जाताना दिसला. अनुष्ठान पूर्ण करून सर्व काही गुरूंना सांगितले. तेव्हा अत्यंत प्रसन्न होऊन गुरुजींनी त्यांच्यावर आशीर्वादाची पुष्पवृष्टी केली. आता माझा एक निद्वांवंद पूर्णपणे नारायणात स्थापित झाला आहे हे समजायला त्यांना वेळ लागला नाही. यानंतर एकनाथजींची 'एकनाथजी महाराज' म्हणून पूजा करण्यात आली. 'एकनाथी भागवत' सारख्या ग्रंथातून त्यांनी समाजात दिव्य रसाचा प्रवाह वाहिला. ते नाथ झाले यालाच 'नाथषष्ठी' म्हणतात.

**- डॉ. वसंतराव लवंगे, नरखेड.**

## कारवाईचा सिलसिला मोदी थांबवणार का?

**किरीट सोमय्या यांची भविष्यवाणी खरी ठरली आहे. शुक्रवारी सकाळी सदानंद कदम यांना ईडीने चौकशीसाठी ताब्यात घेतलं आणि संध्याकाळी त्यांच्या अटकेची बातमी आली. सदानंद कदम यांना चौकशीसाठी ईडीने ताब्यात घेतलं, तेव्हाच सोमय्यांनी त्यांच्या अटकेची माहिती माध्यमांना दिली होती, ती संध्याकाळी सत्यात उतरली. किरीट सोमय्या यांची भविष्यवाणी खरी ठरली. महाराष्ट्रात नवाब मलिक, अनिल देशमुख यांच्यापासून सुरू झालेला केंद्रीय तपास यंत्रणांच्या कारवाईचा सिलसिला संजय राऊत यांच्यापर्यंत आला. दरम्यानच्या काळात महाराष्ट्रात सत्ता बदल झाला, पण कारवाया काही थांबताना दिसत नाहीत. आता अनिल परबांचा नंबर असंही सोमय्यांनी म्हटलं आहे. तर दुसरीकडे राष्ट्रवादी काँग्रेसचे हसन मुश्रीफ यांना कोर्टानं दिलासा दिला असला तरी, तो किती दिवस राहील हे सांगणंही कठीण आहे. दिल्लीत शिक्षण मंत्री मनीष सिसोदिया यांनाही केंद्रीय तपास यंत्रणांनी अटक केलेली आहे.**

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

केंद्रीय तपास यंत्रणांचा हा विरोधकांमागील ससेमिरा थांबला पाहिजे, बंद झाला पाहिजे अशी मागणी आठ दिवसांपूर्वीच देशातील प्रमुख नऊ नेत्यांनी थेट पंतप्रधान नरेंद्र मोदींना पत्र लिहून केली होती. या पत्रावर महाराष्ट्रातील शरद पवार आणि उद्धव ठाकरे यांचीही स्वाक्षरी आहे. यात प्रामुख्याने प्रादेशिक पक्षांच्या नेत्यांनी सही केली आहे. पवार आणि ठाकरेंसह तेलंगणाचे मुख्यमंत्री के. चंद्रशेखर राव, पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी, दिल्लीच मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल, बिहारचे उपमुख्यमंत्री तेजस्वी यादव, उत्तर प्रदेशचे माजी मुख्यमंत्री अखिलेश यादव, जम्मू काश्मीरचे माजी मुख्यमंत्री फारुख अब्दुल्ला, पंजाबचे मुख्यमंत्री भगवंत मान या नेत्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदींना संयुक्त पत्र लिहिले आहे. या पत्रावर काँग्रेस आणि डाव्यांची मात्र सही नाही. सिसोदियांवर झालेल्या कारवाईनंतर हे पत्र लिहिले असल्यामुळे कदाचित काँग्रेसने हात आखडता घेतला असण्याची शक्यता आहे.

या पत्रात त्यांनी विरोधी पक्षातील नेत्यांवर होत असलेल्या कारवाईचा प्रामुख्याने उल्लेख केला आहे. त्यात म्हटले आहे की, 'भारत अजूनही लोकशाही देश असल्याच्या मतांशी तुम्ही सहमत असाल अशी अपेक्षा आहे. विरोधी पक्षातील नेत्यांविरुद्ध केंद्रीय यंत्रणांचा होत असलेल्या गैरवापरावरून असं दिसत आहे की, आपण लोकशाहीतून निरंकुशतेकडे वाटचाल करत आहोत.' दिल्लीचे शिक्षण मंत्री मनीष सिसोदिया यांना सीबीआयने केलेली अटक ही राजकीय कटातून झाली आहे. त्यांच्यावरील आरोप बिनबुडाचे असून ते निरपराध आहेत. त्यांच्यावरील कारवाई हे सुडाचे राजकारण आहे. भाजपच्या सत्ताकाळात लोकशाही धोक्यात आली आहे, असंही या पत्रात म्हटलं आहे. त्यासोबतच केंद्रीय यंत्रणा या फक्त विरोधकांच्याच मागे कशा लागतात, हे उदाहरणासह सांगितलं आहे. त्यात महाराष्ट्रातील नारायण राणेंचाही उल्लेख आहे. त्यांच्याविरोधातही विविध तपास यंत्रणांकडून तपास सुरू होता. मात्र राणेंनी भाजपमध्ये प्रवेश केला आणि सर्वच तपास थंड



बस्त्यात गेला आहे. त्यांच्याविरोधातील तपास आता कुठपर्यंत आला आहे, हेही आता सांगता येणार नाही अशी स्थिती आहे.

विशेष म्हणजे किरीट सोमय्यांनीच राणेंच्या बेहिशेबी मालमत्तेची चौकशी करण्याची मागणी तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याकडे २०१६ मध्ये केली होती.

राणेंसोबतच शारदा चिटफंड घोटाळ्यातील हिमंत बिस्वा सरमा, तृणमूल काँग्रेसमधील सुवेंदू अधिकारी, मुकुल रॉय हेही सीबीआय, ईडीच्या रडारवर होते. मात्र त्यांनी भाजपमध्ये प्रवेश केल्यानंतर त्यांच्याविरोधातील तपासाची आत्ताची प्रगती काय आहे, असा सवाल पंतप्रधानांना लिहिलेल्या या पत्रात विरोधकांनी उपस्थित केला आहे. राज्यात शिवसेना-राष्ट्रवादी आणि काँग्रेस महाविकास आघाडीचे सरकार सत्तेत आल्यानंतर शिवसेनेचे प्रताप सरनाईक, यामिनी जाधव, यशवंत जाधव, नितीन सरदेसाई यांची चौकशी सुरू केली होती. यातील सरनाईक आणि जाधव पती-पत्नी आता शिंदेंसोबत गेले आहेत. त्यानंतर त्यांची चौकशीही थांबली आहे.


विरोधकांचा आवाज बंद करण्यासाठीच केंद्र सरकारकडून केंद्रीय यंत्रणांचा वापर होत असल्याचा आरोप विरोधकांचा आहे. केंद्रीय तपास यंत्रणांसोबतच राज्यपाल या घटनात्मक पदावरील व्यक्तीही विरोधकांविरोधात वापरल्या जात आहेत. राज्यपाल हे केंद्र आणि राज्य सरकार यांच्यातील वाढत्या दरींचे कारण ठरत असल्याचं पत्रात म्हटलं आहे. या पत्राला केंद्र सरकार सकारात्मक प्रतिसाद देईल अशी विरोधकांची भाबडी आशा महाराष्ट्रातील आणि बिहारमधील आजच्या कारवाईवरुन खोटी ठरली आहे. लालू प्रसाद यादव यांच्या तीन मुलींच्या घरी शुक्रवारी धाडी पडल्या आहेत. तर राज्यात शिवसेना ठाकरे गटाचे नेते अनिल परब यांचे पार्टनर सदानंद कदम यांना ईडीकडून अटक झाली आहे. सदानंद कदम हे शिंदे गटाचे नेते रामदास कदम यांचे बंधू आहेत. म्हणजेच त्यांचा संबंध शिवसेनेच्या दोन्ही गटांशी आहे. आता साई रिसॉर्ट घोटाळ्यात थेट ठाकरेंचे निकटवर्तीय परबच यंत्रणांच्या रडारवर आहेत.

पंतप्रधान मोदी या पत्राला किती दाद देतात हे आज सांगणे तरी कठीण आहे. मात्र त्यांचा पूर्वेतिहास पाहिल्यास ही कारवाई थांबणार नाही, अशीच चिन्ह आहेत. त्याचे कारण म्हणजे आंध्र प्रदेश, पश्चिम बंगाल आणि छत्तीसगड या राज्यांनी सीबीआयच्या प्रवेशवार मध्यंतरीच्या काळात बंदी घातली होती. तेव्हा मोदींनी यांना सीबीआयची भीती का वाटते? असा सवाल केला होता. भाजपच्या राष्ट्रीय अधिवेशनाच्या समारोप कार्यक्रमात मोदी म्हणाले होते, गुजरातचा मुख्यमंत्री असताना, काँग्रेस व त्यांच्या सहकारी पक्षांनी, रिमोटवर चालणाऱ्या नेत्यांनी आणि अधिकाऱ्यांनी, त्यांच्या कर्मचाऱ्यांनी तब्बल १२ वर्षे मला छळले. त्यांनी तर एकही संधी सोडली नव्हती. देशातील एकही तपास यंत्रणा अशी राहिली नाही, जिने मला छळले नाही. तुरुंगाची साफ सफाई करून ठेवा, कारण पुढील आयुष्य तुम्हांला तिथेच काढावे लागणार आहे, असे टोमणे काँग्रेस नेते मारत होते. तरीही आम्ही सीबीआय आणि इतर संस्थांना गुजरातमध्ये घुसण्यास कधी बंदी घातली नाही. आमचा सत्ता आणि कायद्यावर विश्वास होता. परंतु हे लोक त्यांचे काळे कारनामे उघड होत असल्यामुळे घाबरलेले आहेत. यांची पोलखोल होत आहे. म्हणून यांनी शिवीगाळ सुरू केली आहे. पण ही कारवाई आता थांबणार नाही. काळे धन आणि भ्रष्टाचाराच्या विरोधात केलेल्या कारवाईने देशाचे राजकारण बदलत आहे.' ही मोदींची भूमिका राहिलेली आहे. त्यामुळे एकजूट नसलेल्या विरोधकांच्या पत्राला मोदी किती आणि कसा प्रतिसाद देतात हे आजच्या दोन कारवायांमुळे दिसून आलेच आहे.

**- उन्मेष खंडाळे.**

जन्म हा अखेरचा

## ज्ञानाचार स्थल



म्हणून विवेकी मनुष्य मनालाच आत्मा मानू लागतो. परंतु बुद्धी जड असून ती सुषुप्ति अवस्थेत विलीन होते हे त्याच्या लक्षात येते. कितीही बुद्धीवादी मनुष्य असला तरी गाढ निद्रेत त्याची बुद्धी जागी राहत नाही, त्याची अवस्था अजाण बालकासारखी असते आणि नंतर त्याला कळते की ज्याच्यामुळे बुद्धी प्रकाशित होते असे स्वयंभू, स्वतंत्र चैतन्य पलिकडे आहे, तोच आत्मा होय.

याप्रमाणे शुद्ध आचार, शुद्ध भावना आणि शुद्ध ज्ञान यांच्या सहाय्याने जो मनुष्य आपल्या हृदयातील अंतर्ज्योतीचा साक्षात्कार करुन घेतो, त्याला कोणतीही कर्मे बांधून ठेवू शकत नाहीत. तो जीवन्मुक्त अवस्थेत विचरण करीत असतो. बाह्यदृष्टीने पाहिले तर तो जीवन जगत असतो आणि अंतदृष्टीने पाहिले तर तो जीवन्मुक्त असतो याप्रमाणे श्री सिद्धांतशिखामणी ग्रंथातील ज्ञानाचारस्थलात ज्ञानाचे आणि ज्ञानी पुरुषाचे महात्म्य वर्णिले आहे. तुम्ही सर्वजण शुद्ध आचार, शुद्ध भावना आणि शुद्ध ज्ञान यांच्या सहाय्याने, सद्गुरुकृपेने शिवाद्वैतज्ञान संपादन करावे आणि जीवन्मुक्त व्हावे, अशी शुभकामना करतो.

**लिंग-षट्स्थलांतर्गत प्रसावीस्थल**

**कायानुग्रहस्थल - १**

**विश्वेशलिंगसंभूतं विश्वविद्याविबोधकम् ।**
**विश्ववेद्यं सदा वन्दे विश्वाराध्यं जगद्गुरुम् ।।**

श्रीकाशीज्ञानसिंहासनाचे आद्यजगद्गुरु विश्वाराध्यापासून विश्वेश्वरशिवाचार्यांपर्यंत चालत आलेल्या गुरुपरंपरेला अनंत प्रणिपात समर्पित.

**(क्रमश:) - काशी जगद्गुरु डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजी.**

जनमानस

## महिला दिन आणि महिला सक्षमीकरण

प्रतिवर्षी जागतिक महिला दिन देशभर उत्साहात साजरा केला जातो. या दिवशी नेतेमंडळींकडून स्त्री पुरुष समानतेच्या, महिलांच्या सक्षमीकरणाच्या गोष्टी केल्या जातात, महिलांचा आदर करण्याचे सल्ले दिले जातात. महिलांच्या सन्मानार्थ शासकीय कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. वृत्तपत्रे आणि वृत्तवाहिन्यांतून कर्तृत्ववान महिलांचा गौरव केला जातो.

या दिवशी अनेक दुकानांमध्ये, ऑनलाईन शॉपिंग साईट्सवर महिलांसाठी विशेष सवलत दिली जाते. या एक दिवशी महिलांना यथोचित सन्मान दिला जात असला तरी अन्य दिवसांतील महिलांविषयक गुन्ह्यांचा आलेख पाहता तो आजवर नेहमीच चढता राहिला आहे, दिवसागणिक समाजाचे होत चाललेले नैतिक अध:पतन



ही चिंतेची बाब आहे. त्यावर आज उपाययोजना काढली नाही, तर भविष्यात स्त्रियांना समाजात वावरणे कठीण जाऊ शकते. त्यासाठी देशात अश्लील संकेतस्थळाच्या प्रसारणावर पूर्णतः बंदी आणणे आवश्यक आहे. वेब सिरीज, चित्रपट आणि जाहिरातींमध्ये अश्लील आणि कामुक दृश्ये दाखवण्यास प्रतिबंध घातला पाहिजे. शाळांमध्ये नैतिक मूल्याच्या वर्गांना थोर मोठ्यांच्या चरित्रांसोबत रणरागिणी झाशीची राणी, राजमाता जिजाऊ, पुण्यश्लोक अहल्याबाई होळकर यांची चरित्रे शिकवली गेली पाहिजेत. मुलींना शाळा महाविद्यालयांतून स्व-संरक्षणार्थ जुडो कराटेचे प्रशिक्षण अनिवार्य केले पाहिजे. इतरांवर अवलंबून राहण्याऐवजी स्वतःच्या रक्षणाची जबाबदारी ही प्रत्येक स्त्रीने स्वतःच घेतली पाहिजे. हेच खऱ्या अर्थाने महिला सक्षमीकरण असेल.

**- मोक्षदा घाणेकर, मुंबई.**

## नागरिकांचा खेळ होतो, आमचा जीव जातो

२८ मार्च, २०२२ रोजी सिंधुदुर्ग जिल्ह्यातील मालवण तालुक्यामधील तळगाव गावडेवाडी येथे बैलांच्या झुंजीचे आयोजन करण्यात आलेले होते. त्या घटनेला आता एक वर्ष पूर्ण होईल. त्या झुंजीमध्ये वेंगुर्ले तालुक्यामधील आसोली गावातील विली केरकर यांचा बाबू नावाचा बैल जखमी झाल्याने त्याचा दुसऱ्या दिवशी मृत्यू झाला. म्हणजे त्याला किती इजा झाली असेल? याची कल्पना येते. आपल्याला साधी ठेच जरी लागली तरी दोन-तीन दिवस किती त्रास होतो याची सर्वांना माहिती आहे. त्यावेळी आपल्याला आपले आई-वडील आठवतात. जर बैलाला बोलता आले असते, तर नक्की बैल म्हणाला असता 'नागरिकांचा खेळ होतो, आमचा जीव जातो.' तेव्हा असे प्रकार पुढे होऊ नयेत आणि दुसऱ्या बाबू बैलाचा जीव जाऊ नये म्हणून सरकार तसेच नागरिकांना जागृत करण्यासाठी घेतलेला थोडक्यात आढावा.

तेव्हा बैलांच्या झुंजी आयोजित करण्यापूर्वी आयोजकांनी काळजी घेणे आवश्यक आहे. आधीच जिल्ह्यातील नागरिक रोजीरोटीसाठी शहरात जात असल्यामुळे एकवेळ गोठ्यात बैल, गाई व वासरे असणारे गोठे आज ओस झालेले दिसतात. सध्या तर घर सारवायलासुद्धा विकत शेण आणावे लागते, अशी परिस्थिती पाहायला मिळते. तेव्हा पुन्हा दुसरा बाबू जाणार नाही, याची खबरदारी शासनाला घ्यावी लागेल. कदाचित झुंजीत जिंकणारा बैल मालक डोक्याला फेटा बांधून पारितोषिक घेऊन मोकळा होईल. मात्र मुक्या जनावरांचे हकनाक बळी जाऊ लागले, तर त्याला जबाबदार कोण? असा प्रश्न पुन्हा निर्माण होऊ नये म्हणून सामाजिक कार्यकर्ते व स्थानिक लोक प्रतिनिधींनी पुढे येणे आवश्यक आहे.

महत्त्वाची बाब म्हणजे, 'कडक उन्हाळ्याचा विचार करता, उन्हाळ्यामध्ये बैल झुंजी लावणे योग्य आहे का? त्याला सरकारची परवानगी आहे का? बैल झुंजी लावण्या योग्य जागा आहे का? त्यासाठी कशा प्रकारे नियोजन केलेले आहे? अशा अनेक प्रश्नांची उत्तरे आयोजकाला अगोदर शोधावी लागतील.'

आज बैलांच्या किमतीसुद्धा गगनाला भिडलेल्या आहेत. अशातच बाबू नावाच्या बैलाचा मृत्यू झाल्याने बैल मालकाला काय वाटले असेल? हा प्रसंग पाहिल्यानंतर व स्थानिक वर्तमानपत्रात बातम्या छापून आल्यावर जिल्ह्यातील जनता हळहळली. तेव्हा पुन्हा हळहळ नको म्हणून ठोस पावले उचलावी लागतील. मात्र पुढाकार कोण घेणार? हा खरा प्रश्न आहे.

आता मार्च महिना सुरू आहे. या घटनेला एक वर्ष पूर्ण होईल. यातून आपण काय शिकणार आहोत याचा विचार जिल्ह्यातील जागृत नागरिकांनी करावा. म्हणजे असे प्रकार पुढे होणार नाहीत, याची काळजी घ्यावी लागेल. बैल झुंजीमुळे लोकांची करमणूक जरी होत असली तरी उन्हामध्ये झुंजणाऱ्या मुक्या बैलांची काय अवस्था होत असेल? हे बोलक्या माणसांना सांगून काय उपयोग होणार आहे? तेव्हा मुक्या प्राण्यांचा खेळ होऊ नये, या दृष्टीने पावले उचलणे गरजेचे आहे.

आता जबाबदारी केवळ सिंधुदुर्ग जिल्ह्यातील नागरिकांची नाही, तर प्रत्येक जिल्ह्यातील नागरिकांची आहे. कारण आज सिंधुदुर्ग जिल्ह्यात झाले. उद्या दुसऱ्या जिल्ह्यातही होईल. तेव्हा नागरिकांनी दक्ष राहणे गरजेचे आहे. म्हणजे मुक्या प्राण्यांना त्रास होणार नाही. कारण लोकांची करमणूक होत असली तरी जवळजवळ एक तास झुंज असणे, त्यांच्या तोंडाला फेस येणे, मानेला टोकधार शिंगे लागल्यामुळे रक्तबंबाळ होणे व जीव कासावीस झालेला दिसणे ही राक्षसी प्रवृत्ती नष्ट होणे गरजेचे आहे. तेव्हा यापुढे असे प्रकार केवळ सिंधुदुर्ग जिल्ह्यात नव्हे, तर कोणत्याही जिल्ह्यात होऊ नये म्हणून महाराष्ट्र शासनाने जिल्हाधिकाऱ्यांना सूचना देणे आवश्यक आहे. माझे वडील म्हणायचे, 'रेड्या-पाड्याची झुंज आणि झाळींचे मरण' आता परस्परविरोधी परिस्थिती पाहायला मिळते. भविष्यकाळाचा विचार करता हे प्राण्यांच्या दृष्टीने घातक असून हे चित्र बदलणे गरजेचे आहे.



अशा जीवघेण्या झुंजी थांबविणे आवश्यक आहे. त्यासाठी प्राणी मित्राने पुढे यायला हवे. तेव्हा यापुढे एकही बाबू (बैल) झुंजीमध्ये मरण पावणार नाही, याची बैल मालकांनी काळजी घ्यावी. यात बिनतिकिटामध्ये नागरिकांची करमणूक होत असली तरी त्यात बैलांचा जीव जातो. तेव्हा करमणुकीची अनेक साधने आहेत. बैल झुंजीमुळे आपली करमणूक होते असे वाटत असले तरी अशा झुंजींना विरोध केला पाहिजे. तो सुद्धा तात्पुरता नको तर कायमस्वरूपी हवा. त्यासाठी कायद्याची प्रामाणिकपणे अंमलबजावणी होणे आवश्यक आहे. म्हणजे असे प्रकार पुढे होणार नाहीत, तरच मुक्या प्राण्यांना 'नागरिकांचा खेळ होतो, आमचा जीव जातो' असे म्हणण्याची वेळ येणार नाही.

**- रविंद्र तांबे.**

सुराज्य सोलापूर हे दैनिक मुद्रक, प्रकाशक राकेश हरिपंत टोळये यांनी सह्याद्री पब्लिशर्स, १५७/१५८, औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तेथे आणि ६०६/७/८, नारायण पेठ, पुणे-३० येथून एकाचवेळी प्रकाशित केले. सोलापूर मुख्य कार्यालय - फोन-०२१७-२६०७२०१, फॅक्स-०२१७-२६०७२०२, पुणे शहर कार्यालय - फोन/फॅक्स - ०२०-२४४६४७५५. I R. N. I. NO. MAHMAR / २००२/९७०७/२००३ I Email - dailysuraajya@gmail. com संस्थापक - स्व. राजेश विष्णूपंत कोठे, संपादक - राकेश टोळये.



## विठ्ठलराव शिंदे पतसंस्थेच्या चेअरमनपदी संतोष डिग्रजे

**टेंभुर्णी** : विठ्ठलराव शिंदे सहकारी साखर कारखाना सेवकांची सहकारी पतसंस्था मर्या, गंगामाईनगर, पो.पिंपळनेर,ता.माढा,जि. सोलापूर या पतसंस्थेच्या नवनिर्वाचीत संचालक मंडळाचे पहिल्या सभेत कार्यकारी संचालक संतोष डिग्रजे यांची चेअरमन पदी व संभाजी थिटे केन मॅनेजर यांची व्हाईस चेअरमनपदी बिनविरोध निवड करण्यात आली. विठ्ठलराव शिंदे कामगार पतसंस्थेची सन २०२२-२३ ते २०२७-२८ या कालावधीसाठीची पंचवार्षिक निवडणूक दि.२८ रोजी बिनविरोध झाली. पतसंस्थेचे एकूण १६ संचालक बिनविरोध निवडून आलेले आहेत. शुक्रवार दि.१० रोजी दुपारी १२.३० वा. निवडणूक निर्णय अधिकारी तथा सहकारी अधिकारी श्रेणी-१ एस.आर.मुंढे यांचे अध्यक्षतेखाली झालेल्या नवनिर्वाचीत संचालक मंडळ सभेत विठ्ठलराव शिंदे कारखान्याचे कार्यकारी संचालक संतोष डिग्रजे यांची पतसंस्थेच्या चेअरमन पदी व केन मॅनेजर संभाजी थिटे यांची व्हाईस चेअरमनपदी बिनविरोध निवड झाली. या प्रसंगी पतसंस्थेचे संचालक अनिल जगताप, दिलीप लव्हटे, रमेश खेडकर, बालाजी गिड्डे, तानाजी लोंढे, सुनिल शिंदे,नानासो डुबल, पांडूरंग बागल, रामचंद्र डांगे, पांडूरंग लोंढे, तानाजी व्हनमाने, शरद वाघमारे, चंद्रकांत कुटे,शहाजी गोसावी व कारखान्याचे खातेप्रमुख जनरल मॅनेजर एस.आर.यादव, जनरल मॅनेजर(प्रोसेस)पी.एस.येलपले,वर्क्स मॅनेजर ए.डी. ढेकाने, चिफ इंजिनिअर एस.डी.कैंचे, हेड टाईम किपर आर.एन.आत्तार, सुरक्षा अधिकारी एफ.एम.दुंगे व पतसंस्थेचे सचिव यु.डी.माळवदकर उपस्थित होते.



## रामवाडी आरोग्य केंद्रातील महिलांचा सन्मान

**सोलापूर** : सद्गुरू बहुउद्देशीय सामाजिक संस्थेकडून जागतिक महिला दिन रामवाडी आरोग्यवर्धिनी प्राथमिक आरोग्य केंद्र येथील महिला दिन व कोविड वॉरियर्स हा सन्मान देऊन साजरा करण्यात आला. कार्यक्रम रामवाडी आरोग्यवर्धिनी प्राथमिक आरोग्य केंद्र येथे पार पडला या कार्यक्रमास वैद्यकीय अधिकारी, आरोग्यसेविका, अंगणवाडी सेविका अशा, तीस कोविड वॉरियर्स जणांचा सन्मानचिन्ह, सन्मानपत्र व पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला.या कार्यक्रमास प्रमुख अतिथी डॉ स्वरांजली पवार, डॉ. अनुलता रणखांबे, विकास कस्तुरे, रवींद्र गोयल, मिलिंद गायकवाड, शुभम राऊत, नागेश राजमाने, विशाल पवार, निकिता राठोड आदी मान्यवरासह, संस्थेच्या अध्यक्षा भाग्यश्री वंजारे, अश्विनी जाधव, शुभांगी लचके, प्रथमेश येरफुल, इत्यादी सदस्य व उपस्थित होते. श्रेया लचके या बाल विद्यार्थिनीने बहारदार नृत्य सादर केले तसेच वैद्यकीय अधिकारी डॉक्टर स्वरांजली पवार यांनी सद्गुरू बहुउद्देशीय संस्थेचे काम प्रशंसनीय असून कोविड काळातील आपल्या समस्या व त्यावर मात कशी केली यांच्या आठवणींना उजाळा दिला. विकास कस्तुरे यांनी आपले मनोगत व्यक्त केले व आरोग्य खात्याचे काम प्रशंसनीय असून स्त्रियांचे सर्व क्षेत्रातील योगदान खूप महत्त्वपूर्ण आहे व त्यांनी स्त्री पुरुष समानता याचे महत्त्व सांगितले. मिलिंद गायकवाड सरांनी हे आपले मनोगत व्यक्त केले तर सूत्रसंचालन भाग्यश्री वंजारे व आभार प्रदर्शन रेखा गायकवाड यांनी केले.

## सांगोला बचत भवन येथे कायदेविषयक शिबीर

**सांगोला** : जागतीक महीला दिनाचे निमीत्ताने विधी सेवा समिती सांगोला व विधिज्ञ संघ सांगोला यांचे संयुक्त विदयमाने न्यायीक अधिकारी व विधीज्ञ यांचे उपस्थितीत महीलांबाबत कायदेविषयक शिबीर मोठया उत्साहात संपन्न झाले. महाराष्ट्र विधी सेवा प्राधिकरण, मुंबई व जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, सोलापुर यांचे निर्देशाप्रमाणे पंचायत समिती येथील बचत भवन येथे शिबीर आयोजित केले होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक ॲड. धनंजय मेटकरी यांनी करून पिडीत नुकसान भरपाई व मनोधैर्य यावर माहीती दिली. ॲड.सोनिया गिराम यांनी महिलांविषयक विविध कायदयाची माहीती दिली. ॲड.सुनिता धनवडे यांनी हुंडा निषीद कायदा, ॲड. विजयसिंह चव्हाण यांनी महीलांचे मालमत्तेमधील अधिकार व ॲड. शिवानंद पाटील यांनी कौटुंबिक हिंसाचार कायदयाची माहीती दिली. यावेळी सांगोला न्यायालयाचे तिसरे सह दिवाणी न्यायाधिश के.बी. सोनवणे यांनी आजची महीला सजग व सक्षम कशी होईल याबाबत मार्गदशन केले. यावेळी सांगोला न्यायालयाचे सह दिवाणी न्यायाधिश यु. एम. पाटील उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन ॲड. गजानन भाकरे यांनी केले व कार्यक्रमाची सांगता सहायक गट विकास अधिकारी काळुखे यांनी आभार प्रदर्शनानी केली. शिबीरास अंगणवाडी सेविकांनी उत्साहात सहभाग घेतला यावेळी सांगोला विधीज्ञ संघाचे अध्यक्ष ॲड. धनंजय मेटकरी उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी होणेकरीता न्यायालयीन कर्मचारी वरीष्ठ लिपीक डी.बी.राहीरकर, लिपीक ए. एस. यादव तसेच शिंदे, माळी, अंटद यांनी विशेष परीश्रम घेतले.

## पर्यटन विकासामध्ये तंत्रज्ञानाचे योगदान उल्लेखनीय : डॉ. फडणवीस

**अक्कलकोट** : देशाच्या पर्यटन विकासामध्ये विज्ञान व तंत्रज्ञानाचे योगदान उल्लेखनीय आहे, असे प्रतिपादन पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मृणालिनी फडणवीस यांनी केले. अक्कलकोट एज्युकेशन सोसायटी संचलित सी.बी. खेडगी महाविद्यालयातील भूगोल विभाग व वनस्पतीशास्त्र विभागाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या देशांतर्गत पर्यटनाची संधी आणि लाइफ सायन्स या दोन विषयांच्या राष्ट्रीय चर्चासत्राच्या कार्यक्रमाच्या उद्घाटन प्रसंगी कुलगुरू डॉ. फडणवीस बोलत होते. अध्यक्षस्थानी संस्थेचे सचिव सुभाष धरणे हे होते. यावेळी व्यासपीठावर माजी नगराध्यक्षा शोभाताई खेडगी, संस्थेचे अध्यक्ष बसलिंगप्पा खेडगी, उपाध्यक्ष अशोक हारकुड,संचालक अडव्होकेट अनिल मंगरुळे, चंद्रकांत स्वामी, श्रीशैल भरमशेट्टी, ज्योती धरणे, प्राचार्य डॉ. शिवराय आडवीतोट, माजी प्राचार्य के. एम. जमादार, मंद्रुपचे प्राचार्य डॉ. बी. एम. भांजे उपस्थित होते. याप्रसंगी महाविद्यालयातील डॉ. सिद्धार्थ मुरूमकर, डॉ. भैरप्पा कोणदे, वीरभद्र मोदी यांचाही सन्मान करण्यात आला.

# स्वत:चे काम समजून कामे करा : उपायुक्त माने

## विविध विकास कामांचा घेतला आढावा

सुराज्य/सोलापूर

**जबाबदारीने कामकाज करून तळागाळातील लाभार्थींना महिला व बालविकास सेवा योजनेचा लाभ द्या, असे अहवान पुणे येथील महिला व बालकल्याण विभागीय उपायुक्त संजय माने यांनी केले.**

### लोकांना अंगणवाडी आपली वाटली पाहिजे

अंगणवाडीच्या सेवा व उद्दिष्टे हे सर्व अंगणवाडी सेविका, पर्यवेक्षिका, बालविकास प्रकल्प अधिकारी यांना तोंडपाठ असले पाहिजेत तसेच गृहभेटीव्दारे जास्तीत जास्त लोकवर्गणी जमा करून अंगणवाडी केंद्राच्या भौतिक सुविधा, दर्जा उंचावताना लोकांना अंगणवाडी ही आपली अंगणवाडी वाटली पाहिजे असे मत माने यांनी व्यक्त केले.

महिला व बालविकास पुणे विभागाचे उपायुक्त संजय माने यांनी सोलापूर जिल्ह्यास भेट देऊन महिला व बालविकास मार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध विकास कामांचा आढावा घेतला. यावेळी जिल्हा कार्यक्रम अधिकारी जावेद शेख, बालविकास प्रकल्प अधिकारी किरण जाधव, वर्षा पाटील तसेच जिल्ह्यातील सर्व ग्रामीण बालविकास प्रकल्प अधिकारी, संरक्षण अधिकारी , अधीक्षक महिला व बालगृहे तसेच नागरी प्रकल्पातील सर्व मुख्य सेविका उपस्थित होते.

विभागीय उपायुक्त माने म्हणाले, महिला व बालविकास विभागामध्ये काम करणे म्हणजे एक लोकहिताचे काम करत असलेची भावना मनात ठेवून योजनांचा लाभ देणे हे केवळ काम म्हणून न करता सेवाभावी उददेश डोळयासमोर ठेवून योजना राबविणेबाबत उपायुक्त संजय माने यांनी सर्व बालविकास प्रकल्प अधिकारी, संरक्षण अधिकारी यांना आवाहन केले.

संरक्षण अधिकारी यांचे कामकाजाचा आढावा घेताना मिशन वात्सल्य अंतर्गत विविध सेवांचा लाभ देताना लाभार्थी आपल्यापर्यंत येण्याची वाट न पाहता आपण स्वतः लाभार्थी पर्यंत पोहोचावे अशा सूचना माने यांनी यावेळी दिल्या.ग्रामीण प्रकल्पातील बालविकास प्रकल्प अधिकारी यांचा बालआधार नोंदणी, पोषण ट्रॅकरमध्ये बालकांच्या वजनाची नोंदणी, माझी कन्या भाग्यश्री, सिंगल नोडल खाते तसेच अंगणवाडी कर्मचाऱ्यांची सुरु असणारी भरती याबाबत सविस्तर आढावा घेतला.

अंगणवाडी कर्मचाऱ्यांची रिक्त पदांची भरती सुरु असून सदर भरती पूर्णपणे पारदर्शक पध्दतीने करणेबाबत उपायुक्त संजय माने यांनी बालविकास प्रकल्प अधिकारी यांना सूचना दिल्या. आढावा सभेस जिल्हा परिषद जिल्हा कार्यक्रम अधिकारी जावेद शेख, बालविकास प्रकल्प अधिकारी किरण जाधव, वर्षा पाटील, सुवर्णा जाधव, रेशमा पठाण, आनंद जाधव , बालाजी आलडवाड, जगन्नाथ गारुळे, समाधान नागणे, अमृत सरडे, आसमा आत्तार, किरण सूर्यवंशी तसेच जिल्हा परिषद कक्ष अधिकारी श्री चंद्रकांत होळकर व विस्तार अधिकारी श्रीकांत मेहेरकर इत्यादी उपस्थित होते. बैठक यशस्वी करणेसाठी अर्चना निंबाळकर, कलादगी व अमिता वसेकर यांनी परिश्रम घेतले.

## खंडाळी येथे भावकीतील २ गटात काठी आणि दगडाने मारहाण

सुराज्य/सोलापूर

भावकीतील शेतजमिनीच्या बांधाच्या वादातून दोन गटात काठी आणि दगडाने झालेल्या मारहाणीत दोन महिलासह तिघेजण जखमी झाले. ही घटना खंडाळी (ता.मोहोळ) येथे रविवारी सकाळच्या सुमारास घडली. त्यांना मोहोळ येथे प्राथमिक उपचार करून सोलापुरातील शासकिय रुग्णालयात दाखल करण्यात आले. प्रियंका मुळे (वय २५) आणि तिची आई गंगुबाई अप्पासाहेब मुळे (वय ५०, दोघी रा. खंडाळी) अशी पहिल्या गटातील जखमींची नावे आहेत.



त्यांना बांधाच्या वादातून विठ्ठल कुंडलिक मुळे आणि त्याचा भाऊ अभिजीत मुळे या दोघांनी मारहाण केली. तर दुसऱ्या गटातील विठ्ठल कुंडलिक मुळे (वय ६३ रा.खंडाळी) हे जखमी झाले. त्यांना त्याच कारणावरून प्रियंका आणि तिची आई गंगुबाई मुळे यांनी दगड आणि लाथाबुक्याने मारहाण केली. अशी प्राथमिक नोंद तालुका पोलिसात झाली आहे.

## बहुजन समाजाने महामानवांच्या विचारांचे विचारमंथन करावे : खेडेकर

सुराज्य/अकलूज



बहुजन समाजाने देवदेवतांचे पारायण करण्यापेक्षा राष्ट्रमाता जिजाऊ, छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज, अहिल्याबाई होळकर, डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर, अण्णाभाऊ साठे, क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले, सावित्रीबाई फुले आदी महामानवाच्या कार्याची पुस्तके वाचून त्यांचे कार्य बहुजन समाजातील सामान्य जनतेसमोर ठेवून समाज एकत्रित करण्याचे व सर्वच महामानवाचा खरा इतिहास तळागाळातील जनतेसमोर आणण्याचे काम करावे असे मत मराठा सेवा संघाचे संस्थापक अध्यक्ष पुरुषोत्तम खेडेकर यांनी व्यक्त केले.

जनसंवाद यात्रेनिमित्त अकलूज येथे आले असता त्यांनी हे आवाहन केले. सदर दौऱ्यात प्रदेश कार्याध्यक्ष अर्जुन तनपुरे, मराठा सेवा संघाचे पुणे विभागीय अध्यक्ष उत्तमराव माने शेंडगे, पुणे विभागीय कार्याध्यक्ष रवींद्र पवार, मराठा सेवा संघ सोलापूर जिल्हा अध्यक्ष तात्यासाहेब पाटील, सोलापूर जिल्हा जिजाऊ ब्रिगेडच्या अध्यक्षा मीनाक्षी जगदाळे, मराठा सेवा संघाचे तालुकाध्यक्ष डॉ रामचंद्र मोहिते, संभाजी ब्रिगेडचे माळशिरस तालुका अध्यक्ष दिगंबर मिसाळ, जिजाऊ ब्रिगेडच्या तालुकाध्यक्ष सौ मनोरमा लावंड, माजी अध्यक्ष वनिता कोरटकर, तालुका कार्याध्यक्ष निनाद पाटील, संभाजी ब्रिगेडचे माजी तालुकाध्यक्ष डॉ.अमोल माने, अजित माने, डॉ. विश्वस कदम डॉ भोसले, डॉ विठ्ठल कोडग, डॉ बापू सणस, शमा जगताप, माळशिरस, करमाळा, पंढरपूर, या तालुक्याचे सेवा संघाचे संभाजी ब्रिगेडचे सर्व तालुका कार्यकारिणी सदस्य, अकलूज शहर विभागातील जिजाऊ ब्रिगेडच्या सर्व पदाधिकारी, बहुजन समाजातील महिला व पुरुष मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.सदर संवाद यात्रेत अर्जुन तनपुरे, उत्तमराव माने, तात्यासाहेब पाटील, निनाद पाटील आदींनी उपस्थित कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले.

सदर संवाद यात्रेचे सूत्रसंचालन मराठा सेवा संघाचे तालुका सचिव राजेंद्र मिसाळ यांनी करून कार्याध्यक्ष निनाद पाटील यांनी आभार मानले.

## मुलीच्या लग्नासाठी पूजा करावी लागेल असे सांगत महिलेची फसवणूक

**सोलापूर** : तुमच्या घरावर करणी केली आहे, मुलाच्या लग्नासाठी पूजा करावी लागेल,असे म्हणत महिलेला ६० हजारांना फसवल्याची घटना शहरात घडली. याबाबत शारदा बाबूराव कोष्टी (वय-५०,रा.सिध्दरामेश्वर वस्ती, विनायकनगर) यांनी सदर बझार पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. कोष्टी या इंडीवरून येताना त्यांना तेथे रेल्वे स्टेशनवर एका अनोळखी व्यक्तीची भेट झाली.

त्यावेळी कोष्टी यांनी आपल्या मुलाच्या लग्नाबाबत सांगितले. त्यावेळी आरोपीने फिर्यादींना मोबाइल नंबर दिला. त्यानंतर त्याने २८ फेब्रुवारी रोजी सोलापुरात येऊन तुमच्या घरातील कोणीतरी करणी केली आहे, पूजा करावी लागेल, म्हणत पूजेची मांडणी करीत रोख पंधरा हजार रुपये एका ब्लाऊजपीसमध्ये बांधण्यास सांगितले. त्यानंतर ती रक्कम घेऊन तो गेला. थोड्या दिवसानंतर येऊन आणखी मोठी पूजा करावी लागेल, असे म्हणत नव्या सहा साड्या खरेदी केल्या. शिवाय पूजेला बसल्यानंतर सोने ठेवावे लागेल असे सांगितले. यामुळे फिर्यादींनी गळ्यातील सोन्याचे गंठण पूजेसाठी दिले. त्यानंतर त्याचा मोबाइल नंबर बंद लागला.यामुळे आपली ६० हजारांची फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर कोष्टी यांनी दिलेल्या फिर्यादीवरून अज्ञात आरोपीवर गुन्हा दाखल झाला आहे. घटनेचा तपास पो.स.इ. रजपूत करीत आहेत.

## बिज्जरगी लिखित ज्ञानसूर्य काव्यसंग्रहाचे प्रकाशन


सुराज्य/दक्षिण सोलापूर



विजय बिज्जरगी लिखित ज्ञानसूर्य या अभिवादन काव्यसंग्रहाचे प्रकाशन थोर गांधीवादी विचारवंत कै. दि.शि. कमळे गुरुजी जन्मशताब्दी वर्षानिमित्त जीवन विकास प्रशाला भंडारकवठे येथील कलाशिक्षक विजय बिज्जरगी लिखित ज्ञानसूर्य या अभिवादन काव्यसंग्रहाचे प्रकाशन गांधीवादी विचारवंत प्रा. नरेश बदनोरे यांच्या हस्ते जीवन विकास प्रशालेच्या प्रांगणात झाले.

या प्रसंगी बोलताना बदनोरे म्हणाले शिक्षक हा व्यासंगी असावा शैक्षणिक कामाबरोबर समाजाभिमुख होऊन काम करावे कमळे गुरुजींचे आदर्श डोळयासमोर ठेवून शैक्षणिक कार्य करीत रहावे या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी गावचे प्रथम नागरिक चिदानंद कोटगोंडे हे होत. प्रमुख अतिथी म्हणून सुविद्या प्रकाशनचे बाबुराव मैंदर्गीकर व बाजार समितीचे संचालक वसंतराव पाटील, विठ्ठल बाबुराव पाटील उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक एस. एम. नदाफ यांनी केले याप्रसंगी विद्यार्थी प्रतिनिधी म्हणून कुमारी ऋतुजा वारे या विद्यार्थिनीने मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमास रवींद्र कदम, हणमंत पुजारी, चंद्रकांत माढे बसवंतराव हाडसंगे, आदम जमादार, प्रकाश मुक्काणे, महादेव मुक्काणे, बसवंत पाटील मल्लिकार्जुन हत्ताळे, लक्ष्मण बिराजदार, सिद्धाराम कुगणे, भागवत बिराजदार मान्यवर उपस्थित होते. सूत्रसंचालन हडपद पी.जी. एस. एम. सुसलादी यांनी केले तर आभार मलकारी ए. एस. यांनी मानले.



आमदार सुभाष देशमुख यांचा वाढदिवसानिमित्त के.के. प्रतिष्ठानचे अध्यक्ष सोमनाथ केंगनाळकर यांनी सत्कार केला.

## तलवार घेऊन फिरणाऱ्या तरुणावर गुन्हा दाखल

सुराज्य/सोलापूर

तलवार घेऊन फिरणाऱ्या इसमाला पोलिसांनी पकडले असून त्याच्या ताब्यातून ३१ इंची तलवार जप्त करण्यात आली आहे.याप्रकरणी गणेश शिवानंद आंडगे (वय-४१, रा.पुर्व मंगळवार पेठ) याच्यावर गुन्हा दाखल झाला आहे.याबाबत भारत गायकवाड यांनी फिर्याद दिली आहे.

रंगपंचमीच्या पार्श्वभुमीवर पोलिसांकडून शहरात कडेकोट बंदोबस्त ठेवला होता. यावेळी एक तरूण तलवार घेऊन फिरत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. या माहितीवरून पोलीसांनी सराफ कट्टा येथिल वारद बोळ येथे थांबलेला आंडगे याच्या हलचाली संशयास्पद वाटले. यामुळे पोलिसांनी झडती घेतल्यानंतर त्याच्याजवळ एकूण ३१.५ इंची तलवार आढळली. घटनेचा तपास हवालदार खाजप्पा आरेनवरू हे करत आहेत.

# रणदिवेवाडी येथे रेल्वे कर्मचाऱ्याचा खुनाचा प्रयत्न; चौघांविरुध्द गुन्हा

सुराज्य/सोलापूर

पूर्वीच्या भांडणावरून गावाकडे बोलावून एका रेल्वे कर्मचाऱ्यास लोखंडी रॉड आणि काठीने मारून खुनाचा प्रयत्न करण्यात आला. ही घटना रणदिवेवाडी (ता.माढा) येथे गुरुवारी सायंकाळच्या सुमारास घडली. या प्रकरणात माढ्याच्या पोलिसांनी एकाच कुटूंबातील चौघाविरुद्ध गुन्हा दाखल करून दोघांना अटक केली. प्रभाकर हनुमंत मुलादे (वय ३९ रा. शिवाजीनगर माढा) असे गंभीर जखमी झालेल्या रेल्वे कर्मचाऱ्यांचे नाव आहे. त्यांना उपचारासाठी सोलापुरातील खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आले. त्याला मारहाण केल्याप्रकरणी आनंद रणदिवे त्याचा भाऊ भागवत नारायण रणदिवे, रमेश नारायण रणदिवे आणि भागवत याचा मुलगा (सर्व रा.रणदिवेवाडी ता.माढा) या चौघाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. त्यापैकी दोघांना अटक करून पोलीस कोठडी घेण्यात आली आहे. जखमी प्रभाकर मुलादे आणि आनंद रणदिवे हे दोघे मित्र आहेत.काही दिवसापूर्वी त्यांच्यात भांडण झाले होते. त्या कारणावरून गुरुवारी सायंकाळी त्यांना फोन करून रणदिवेवाडी येथे बोलावून घेतले. आणि महादेव मंदिराजवळ चौघांनी मिळून त्याच्यावर हल्ला केला. त्यानंतर त्यांच्या खिशातील ५० हजार रुपये आणि अंगावरील सोन्याचे दागिने काढून घेतले. अशी नोंद पोलिसात झाली. पुढील तपास फौजदार शेख करीत आहेत.

# सोलापुरात प्रथमच उर्दू शाळांसाठी आंतर शालेय प्रश्नमंजुषा स्पर्धा

सुराज्य/सोलापूर

सोलापूर स्मार्ट उर्दू स्कूल मिशन २०२३ अंतर्गत जिल्हा परिषद महानगरपालिका व नगरपालिका उर्दू शाळांच्या सर्व उर्दू शिक्षकांनी मिळून आंतर शालेय प्रश्नमंजुषा स्पर्धेचे आयोजन केले होते. सोलापुरात पहिल्यांदाच तिन्ही आस्थापनाचे उर्दू शिक्षक एकत्र येऊन एका भव्य प्रश्नमंजुषा स्पर्धेचे नियोजन केले होते.

उर्दू शिक्षण विस्तार अधिकारी अथर परवेझ दफेदार, दौलतबी शेख, मनपा शिक्षण मंडळाचे पर्यवेक्षिका निलोफर सय्यद यांच्या देखरेखित तालुका व जिल्हास्तरावर प्रश्नमंजुषा घेण्यात आली. या स्पर्धेत एकूण सर्व जिल्ह्यातील शाळांमधून एकूण १२२ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता.

या स्पर्धेत अक्कलकोट, दक्षिण सोलापूर व उत्तर सोलापूर सर्व नगरपरिषदे नगरपालिका व महानगरपालिका अंतर्गत येणाऱ्या एकूण ६५ उर्दू शाळांनी सहभाग नोंदविला होता. तालुक्यात प्रथम व द्वितीय क्रमांकच्या शाळांना जिल्हास्तरावर प्रश्नमंजुषा स्पर्धा खेळण्याची संधी मिळाली. जिल्हास्तरावर ज्युनियर ग्रुपमध्ये दहा तर सीनियर ग्रुपमध्ये दहा




असे एकूण २० शाळांमध्ये ही स्पर्धा झाली. जिल्हास्तरावर ज्युनिअर ग्रुपमध्ये प्रथम क्रमांक जिल्हा परिषद उर्दू शाळा बबलाद, द्वितीय क्रमांक जिल्हा परिषद उर्दू शाळा गुलशन नगर तर तृतीय क्रमांक नगर परिषद उर्दू शाळा करमाळा यांना मिळाला. सीनियर ग्रुपमध्ये प्रथम क्रमांक महानगरपालिका मुलांची उर्दू शाळा क्रमांक ६ सोलापूर तर द्वितीय क्रमांक जिल्हा परिषद उर्दू प्राथमिक शाळा शिरवळ तालुका अक्कलकोट तर तृतीय क्रमांक नगर परिषद उर्दू शाळा करमाळा यांनी पटकावला. पारितोषिक वितरण समारंभाला प्रमुख पाहुणे म्हणून शिक्षणाधिकारी संजय जावीर, अक्कलकोटच्या गटशिक्षण अधिकारी कुदसिया शेख, प्रश्नमंजुषा स्पर्धेचे संयोजक नूर चॅरिटेबल ट्रस्टचे सचिव नजीर मुन्शी, गॅलेक्सी हार्डवेअरचे अजहर गदवाल, जिल्हा सोसायटीचे संचालक जुलफिकार मुजावर, गुरु सेवा पॅनलचे अंकुश काळे, अप्सरा ग्रुपचे अलहाज मैनुद्दीन शेख, अब्दुल्ला पानगल, कादर करजगी, अब्दुल रजाक शेख, मोहम्मद लतीफ जागीरदार, इक्बाल बागबान, प्राध्यापक डॉ. शफी चोबदर व इतर मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रस्ताविक मेहमूद नवाज यांनी केले सूत्रसंचालन सुहेल नाईक यांनी केले तर आभार इमरान जमादार यांनी मानले.



## लक्ष्मी हायड्रॉलिक्सकडून कॉम्प्युटर संच व छपाई यंत्र भेट

सुराज्य/सोलापूर : फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया सोलापूर शाखेच्या विनंतीनुसार लक्ष्मी हायड्रॉलिक्स प्रायव्हेट लिमिटेड कंपनीकडून त्यांच्या सी.एस.आर. निधीतून सहा अद्ययावत संगणक व एक रंगीत छपाई यंत्र समारंभ पूर्वक भेट देण्यात आले.

याप्रसंगी लक्ष्मी हायड्रॉलिक्स प्रायव्हेट लिमिटेडचे व्यवस्थापकीय संचालक शरदकृष्ण ठाकरे, संचालक आदित्य ठाकरे, माहिती व तंत्रज्ञान विभाग प्रमुख दत्तात्रेय पत्थर, प्रशासकीय विभाग प्रमुख किसन दाडगे, निरंजन सिंगवी, फॅमिली प्लॅनिंगचे अध्यक्ष प्राचार्य के. एम. जमादार, मार्गदर्शक डॉ. श्रीकांत येळेगावकर, डॉ. राजीव प्रधान, उपाध्यक्ष प्राचार्य डॉ. बी. एन. कांबळे, अ‍ॅड. तेजा कुलकर्णी, कोषाध्यक्ष प्राचार्य डॉ. एन. बी. तेली, सपना चिट्टे, शाखाधिकारी सुगतरत्न गायकवाड, कार्यक्रम अधिकारी वीरेंद्र परदेशी, हिशोबनीस व्यंकटेश मच्छा, वैद्यकीय अधिकारी डॉ. कविता चंडक व कर्मचारी वर्ग उपस्थित होते. यावेळी फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडियाच्यावतीने सुरू असलेल्या विविध प्रकल्पांविषयी माहिती दिली तर शरदकृष्ण ठाकरे यांनी लक्ष्मी हायड्रॉलिक्स प्रायव्हेट लिमिटेड यांच्या सी. एस. आर. निधीतून राबविण्यात येत असलेल्या विविध समाज उपयोगी कार्याविषयी ओळख करून दिली. लक्ष्मी हायड्रॉलिक्स प्रायव्हेट लिमिटेडच्या या भरीव योगदानाबद्दल फॅमिली प्लॅनिंगचे अध्यक्ष प्राचार्य के. एम. जमादार यांच्या हस्ते शरदकृष्ण ठाकरे यांचा शाल व बुके देऊन सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे स्वागत प्राचार्य के. एम. जमादार यांनी केले. प्रास्ताविक डॉ. बी. एन. कांबळे यांनी केले. सूत्रसंचालन सुगतरत्न गायकवाड यांनी केले तर आभार किसन दाडगे यांनी मानले.

# पानी फाऊंडेशनमुळे शेती क्षेत्रात क्रांती : फडणवीस



सुराज्य/पुणे

**आमिर खान यांनी पानी फाऊंडेशनची कल्पना मांडली. इतकेच नव्हे तर पाणी फाऊंडेशनने सातत्य दाखवत जलसंधारण अणि शेतकऱ्यांना समर्थ करण्याचे कार्य केले आहे. आधी वॉटर कपच्या माध्यमातून जलस्वयंपूर्ण गावे तयार केली. आता 'फार्मर कप' च्या माध्यमातून विषमुक्त शेती आणि शेतकऱ्यांचे गट तयार करून महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या समस्यांची सोडवणूक करण्याचे सुंदर मॉडेल तयार केले आहे. पानी फाऊंडेशनने शेती क्षेत्रात क्रांती आणली असल्याचे गौरवोद्गार राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काढले.**

पानी फाऊंडेशनतर्फे बालेवाडीतील शिवछत्रपती क्रीडा संकुल येथे 'सत्यमेव जयते, फार्मर कप २०२२' च्या पुरस्कार वितरणाचा शानदार सोहळा रविवारी पार पडला. त्या कार्यक्रमात फडणवीस बोलत होते. या कार्यक्रमाला पानी फाऊंडेशनचे संस्थापक आमीर खान, किरण राव, सत्यजित भटकळ, डॉ. अविनाश पोळ, पदमश्री पोपटरावर पवार, कृषी आयुक्त सुनील चव्हाण, दिग्दर्शक आशुतोष गोवारीकर, अभिनेते अतुल कुलकर्णी व इतर मान्यवर उपस्थित होते. यावेळी राज्याच्या सर्वच जिल्ह्यांतून हजारो शेतकरी गट, शेतकरी महिला गट उपस्थित होते. या कार्यक्रमात पानी फाउंडेशनचा राज्यस्तरीय फार्मर कप २०२२ हा प्रथम पुरस्कार अमरावतीच्या परिवर्तन शेतकरी गटाला देण्यात आला.

उपमुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, 'वातावरण बदलामुळे शेतीसमोर मोठी आव्हाने आहेत. अशा परिस्थितीत अवर्षण, अतिवृष्टीच्या फेऱ्यातून शेतकऱ्याला बाहेर काढण्यासाठी शाश्वत शेतीला पर्याय नाही आणि त्यासाठी विषमुक्त, नैसर्गिक शेतीकडे जावे लागेल. या सर्व गोष्टी आपण नैसर्गिक शेतीद्वारे करू शकतो. राज्यात कॅन्सरचा प्रादुर्भाव वाढला. म्हणून आपल्याला नैसर्गिक शेतीकडे यावे लागेल.'

### जिल्ह्यातील ४ तालुक्यांचा या स्पर्धेत समावेश

सोलापूर जिल्ह्यातील ४ तालुक्याचा या स्पर्धेत समावेश होता. यामध्ये सहभागी गावामध्ये कळमण (उत्तर सोलापूर), सुर्डी (बार्शी), लोंढेवाडी (माढा) तर करमाळा तालुक्यातील फिसरे गावाने तालुकास्तरीय प्रथम ठरले. शासनाच्या गावच्या विशेषतः कृषी, जलसंधारण, जलयुक्त शिवार, महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी, ग्राम स्वच्छता आदि अनेक योजना आहेत. यासाठी निधी देखील मोठ्या प्रमाणात दिला जात असला तरी लोकसहभागातून गावाचा विकासास खरी गती मिळते. गावच्या विकासासाठी लोकसहभागच महत्त्वाचा असल्याचे कविता घोडके-पाटील यांनी सांगितले.

### फार्मर कप स्पर्धेतील विजेत्यांची नावे

**प्रथम पुरस्कार** - परिवर्तन शेतकरी गट, वाठोडा, ता. वरुड , जि. अमरावती, रक्कम २५ लाख. **द्वितीय पुरस्कार** - चित्रा नक्षत्र महिला शेतकरी गट, गोळेगाव, ता. खुलताबाद, जि. औरंगाबाद, रक्कम १५ लाख रूपये. **संयुक्त तृतीय पुरस्कार** - जय योगेश्वर शेतकरी गट , डांगर बुद्रुक, ता. अंमळनेर, जळगाव, रक्कम ५ लाख रुपये. **संयुक्त तृतीय पुरस्कार** - उन्नती शेतकरी गट, वारंगा तर्फे नांदापूर, ता. कळमनुरी, जि. हिंगोली, रक्कम ५ लाख रुपये.

आमिर खान म्हणाले, 'उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पानी फाऊंडेशनच्या प्रवासात नेहमीच सहकार्य केले. त्यांनी सकारात्मक दृष्टिकोनातून दिलेल्या सहकार्यामुळे चांगले काम करता आले. शेतकऱ्यांनी गट तयार करून आपल्या क्षमता वाढवाव्यात. वैज्ञानिक आणि संशोधकांनी सांगितलेल्या गोष्टी आत्मसात करून पुढे जावे. येत्या काळात महाराष्ट्रात आणि भारतात हजारो कृषि उद्योजक तयार व्हावेत. शेतीला व्यवसायाच्यादृष्टीने पाहून नवतरुणांनी शेतीकडे वळावे, यातील समस्यांवर मात करून पुढे जावे. यावेळी सत्यजित भटकळ आणि पोळ यांनी पानी फाऊंडेशनच्या कार्याची सविस्तर माहिती दिली.

कार्यक्रमाला भारतीय जैन संघटनेचे शांतीलाल मुथा, कृषी सचिव एकनाथ डवले, अभिनेते अतुल कुलकर्णी, सहयाद्री ग्रो फार्मचे विकास शिंदे, राहुरी कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. प्रशांत पाटील, पंजाबराव कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. शरद गडाख आदी उपस्थित होते. यावेळी ध्वनीचित्रफीत आणि शाहीर अवधूत गांधी, नृत्य दिग्दर्शिका फुलवा खामकर यांच्या पथकाने सादर केलेल्या नृत्याविष्काराच्या माध्यमातून पानी फाऊंडेशनच्या कार्याची माहिती देण्यात आली. नीरज नारकर व स्पृहा जोशी यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.



## कला जीवन जगण्याचे साहित्य : शिंदे

सुराज्य/सोलापूर : 'शिक्षणाशिवाय पर्याय नाही, शिक्षणाने माणूस घडतो, कलेबरोबर शिक्षण हे महत्त्वाचे आहे. शिक्षकांचा आदर्श घ्यावा, विद्यार्थ्यांनी आयपीएस व आयएएस अधिकारी होण्याचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी कष्ट करावे असे आवाहन सोलापूर तालुका पोलीस स्टेशनचे पो. नि. नामदेव शिंदे यांनी केलं आहे. उत्तर सोलापूर तालुक्यातील बाणेगाव येथील जिल्हा परिषद शाळेच्या वार्षिक स्नेह संमेलनाचे उदघाटन सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमा पूजनाने करण्यात आले.

यावेळी सरपंच लिंबाजी जाधव, माजी सरपंच बाबासाहेब पांढरे, उपसरपंच सुयोग कांबळे, अनिल पाटील, किर्ती चाफाकरंडे, प्रकाश गावडे, बाबासाहेब देवकते, पोलिस पाटील मधुकर पांढरे, कोमल चव्हाण, संगीता पवार, तोडकर उपस्थित होते. शाळेतील विद्यार्थ्यांनी गणेश वंदन, चंद्रा, शांताबाई, बुरुम बुरुम, श्री वल्ली, लुंगी डान्स, मला आमदार झाल्यासारखं वाटतंय, आपली यारी, डोळ्यात काजळ, ओ शेठ, आम्ही लग्नाळु, होऊदे धिंगाणा, झुबी डुबी, झुमकावाली पोरं, खंडेराया झाली माझी दैना, परमसुंदरी, बुलेट बंडी तेलुगू गाणं, मल्हार मल्हार, राज आलं राज आलं, माझ्या नावानं बांधलंय बंगला, डिस्को दिवाने, अंगात आलंय इत्यादी गाण्यावर मुलांनी जोरदार नृत्य केले. कार्यक्रम पाहून उपस्थित ग्रामस्थ व पालकांनी वाहवा मिळवली. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षक, शाळा व्यवस्थापन समिती यांनी परिश्रम घेतले.



## जि.प. लक्ष्मीनगर शाळेत महिला दिन साजरा

सुराज्य/उत्तर सोलापूर : माळशिरस तालुक्यातील कुसमोड येथील जि. प. प्राथमिक शाळा लक्ष्मीनगर येथे महिला दिनाचे औचित्य साधून संगीत खुर्ची, लिंबू-चमचा व रांगोळी स्पर्धे चे आयोजन तसेच महिला मेळाव्याचे आयोजन करण्यात आले. याचे उद्‍घाटन राजमाता अहिल्यादेवी होळकर, राजमाता जिजाऊ, झाशीची राणी लक्ष्मीबाई यांच्या प्रतिमेचे पूजन शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष संजय पाटील, उपाध्यक्ष रुपाली मदने, ग्रामपंचायत सदस्या स्वाती मदने, शिक्षणतज्ञ प्रियांका मदने, मुख्याध्यापक कोल्हे व उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी अंगणवाडी सेविका सत्यभामा मदने यांनी उपस्थित महिलांना मार्गदर्शन केले तसेच शासनाच्या विविध योजनांची माहिती दिली. तसेच सुशीला मदने यांनीही यावेळी महिलांना मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळा व्यवस्थापन समितीच्या उपाध्यक्षा रुपाली मदने होत्या. यावेळी शाळा व्यवस्थापन समितीतील सर्व महिला सदस्यांचा सन्मान करण्यात आला. सदर कार्यक्रमास लक्ष्मीनगर परिसरातील महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. कार्यक्रमास विजय मदने, नाथा पवार, साधना पवार, नंदिनी मदने, राणी पवार, पल्लवी मदने, रोहिणी मदने, सहशिक्षक सुनील डुरे तसेच जि. प. शाळेतील तसेच अंगणवाडीमधील विद्यार्थी उपस्थित होते. उपस्थितांचे शिक्षणतज्ञ प्रियांका मदने यांनी आभार मानले.

## वाहनाच्या धडकेने युवकाचा मृत्यू

सुराज्य/सोलापूर : छोटा हत्ती वाहनाच्या धडकेने ३० वर्षाचा युवक गंभीर जखमी झाला. उपचाराकरिता त्यास शासकीय रुग्णालयात दाखल केले होते. परंतु उपचारादरम्यान तब्बल पंधरा दिवसांनी त्याचा मृत्यू झाला.

या घटनेची हकीकत अशी की, फिर्यादी आतिश साहेबराव कुचेकर (वय-३०, रा. जय मल्हारनगर, बार्शीरोड बाळे) व त्याचा मावस भाऊ बाळ गंगाधर ऊर्फ गौरव कुमार तुळसे (वय-३०, रा. मेगाणे नगर बार्शी रोड, सोलापूर) असे दोघे मिळून रात्री नऊ वाजण्याच्या सुमारास रस्त्यावरून घराकडे चालत जात असताना मेंगाणे नगर कॅनॉलच्या पुढे पाठीमागून आलेल्या छोटा हत्ती वाहन क्र.एम.एच.१३.सी.यु. ९५५९ या वाहनाने धडक दिल्याने यात बाळ गंगाधर गंभीर जखमी झाला.

डोक्याला जबरदस्त दुखापत झाल्याने त्याच्यावर शासकीय रुग्णालयात उपचार सुरू होते. उपचारादरम्यान तो मयत झाला. छोटा हत्ती वाहन चालकाविरोधात फौजदार चावडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला असून, अधिक तपास पोलीस निरीक्षक भोईटे हे करीत आहेत.

# उजनीच्या पाण्यासाठी प्रयत्न सुरु : आ. कल्याणशेट्टी

सुराज्य/अक्कलकोट

आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी पदभार घेतल्यापासून अक्कलकोट विधानसभा मतदारसंघातील गाव, वाड्या, वस्त्या, तांडे यांच्या विकासाकरिता सतत कार्यरत आहेत. या बरोबरच उजनीचे पाणी मतदारसंघाकरिता मिळणेकामी त्यांचे प्रयत्न सुरु आहे.

अक्कलकोट तालुक्याला तर उजनीचे पाणी मिळणारच आहे. या बरोबरच मतदारसंघातील दक्षिण सोलापूर तालुक्यातील वळसंग परिसरातील सुमारे जवळपास १ हजार ५०० हेक्टर जमिन जलसंपदा विभागाच्या माहितीनुसार जून २०२३ अखेर ओलिताखाली येणार असून एकरुख उपसा सिंचन योजनेची वेगाने अंमलबजावणी करण्यात येत आहे. उजनीतून ३.१८ टीएमसी पाण्याची अक्कलकोट व दक्षिण मधील शेतकरी गेल्या तीन दशकापासून वाट पाहत आहेत. कायम दुष्काळाच्या छायेत राहणाऱ्या या दोन्ही तालुकावासियांना उजनी धरणातील पाणी म्हणजे मृगजळ वाटत होते. पण ती आता आवाक्यात आले आहे. याकामी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, पालकमंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्या नेतृत्वाने पुर्णत्वास येण्यास मदत होत आहे. एकरुख तलावात उजनीचे पाणी सोडले जाणार असून तेथून ते बोरामणी येथे लिफ्ट करुन बोरामणीतून एक कालवा दर्शनाळ मार्गे बोरी नदीला २ टीएमसी तर दर्गनहळ्ळी मार्गे १.१८ टीमएसी वळसंग परिसरात येणार आहे. दर्गनहळ्ळी, वडगाव, दिंडूर मार्गे कालव्यातून पाणी येणार असून अक्कलकोट विधानसभा मतदारसंघातील लिंबी चिंचोळीपासून बंदिस्त नलीका वितरण प्रणालीव्दारे गुरुत्वाकर्षण शक्तीचा वापर करुन लिंबीचिंचोळी १०५, वळसंग ३९८,



आचेगाव २८१, शिंगडगाव ३१५, हणमगाव १८८, औज १८१ अशा जवळपासून १ हजार ४७६ हेक्टरला पाणी दिले जाणार आहे.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सरकारने जलसंधारणाच्या कामाला विशेष महत्त्व दिले असून नक्कीच आ. सचिन कल्याणशेट्टी यांच्या कार्यकाळातच सदरचा प्रकल्प यशस्वीपणे पूर्ण होईल, अशी जलसंपदा विभागाची कार्यप्रणाली एकरुख उपसा सिंचन योजनेकरिता सुरु असल्याने शक्य वाटत आहे.



## स्वस्तिक संस्थेच्या नेत्र शिबिरात पंधराशे लाभार्थ्यांचा सहभाग

### आठशे लाभार्त्यांवर झाली शस्त्रक्रिया

सुराज्य/सोलापूर

स्वस्तिक सामाजिक संस्था, डॉ. वैशंपायन वैद्यकिय महाविद्यालय व छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालय, जिल्हा अंधत्व निवारण समिती, आरोग्य विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने पद्मश्री प्रख्यात नेत्ररोग तज्ञ डॉ. तात्याराव लहाने , जेजे हॉस्पिटल नेत्रविभागाच्या प्रमुख रागिणी पारेख यांच्या उपस्थितीत मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबीर पार पडले.

या शिबिरात जवळपास पंधराशे शिबिरार्थींनी सहभाग घेतला होता त्यापैकी सातशे शिबिरार्थींना उच्च रक्तदाब आणि मधुमेह आढळून आला. या रुग्णांसाठी पुढील सहा महिन्यानंतर शस्त्रक्रिया शिबिर आयोजित करण्यात येणार आहे तर उर्वरित आठशे शिबिरार्थींवर मोतिबिंदू शस्त्रक्रियेसाठी शासकीय रुग्णालयात दाखल करून शस्त्रक्रिया केली.

यावेळी डॉ. तात्याराव लहाने डॉ. रागिनी पारेख यांनी स्वत: शस्त्रक्रिया केली. शस्त्रक्रियेनंतर कोणती काळजी घ्यावी, यावर डॉ. तात्याराव लहाने यांनी मार्गदर्शन केले.

यावेळी जे जे हॉस्पिटलच्या डॉ. रागीनी पारेख, छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालयाचे अधिष्ठाता डॉ. सुधीर देशमुख, आ. विजयकुमार देशमुख, माजी नगरसेवक डॉ किरण देशमुख माजी सभागृह नेते शिवानंद पाटील, संजय कोळी, राजू पाटील, भैय्या बनसोडे, गणेश साखरे, प्रेम भोगडे, समर्थ होटकर, रवी मस्के, शेखर फंड, नागेश रामपुरे, सचिन लकडे, प्रवीण गंलाडे, उमेश कोळेकर, स्वस्तिक सामाजिक संघटनेचे पदाधिकारी कार्यकर्ते आदी मान्यवर उपस्थित होते.

## सरकारी कामात अडथळा; एकावर गुन्हा दाखल

सुराज्य/सोलापूर : तुझ्याकडे दिलेल्या अर्जाचे काय झाले? मी अर्ज दिला आहे. तू मला लेखी दे असे म्हणून मोठमोठ्याने ओरडून जावक रजिस्टर हे खाली फेकून देत सरकारी कामात अडथळा केल्याप्रकरणी गुन्हा दाखल झाला आहे.

घटनेची हकीकत अशी की, संशयित आरोपी अशोक सिद्राम सोनकांबळे (रा. मल्लिकार्जुन नगर वस्ती, सोलापूर) हे भूमी अभिलेख कार्यालय येथे आवक-जावक लिपिक असून, त्यांनी लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालयाकडे अर्ज दिला होता. त्या अर्जाची चौकशी करण्याकरिता ११ मार्च रोजी सायंकाळी पाच वाजता गेले असताना, त्या ठिकाणी कार्यरत असलेले पोलीस हेड कॉन्स्टेबल रशीद रमजान बाणेवाले यांच्याकडे दिलेल्या अर्जाची चौकशी करत असताना हा गोंधळ झाला. फिर्यादीस शिवीगाळा करून तुला बघून घेतो, तुझ्यावर खोटी केस करतो. असे म्हणून शर्टाची गच्ची धरून अंगावर हात उगारला.अशा आशयाची फिर्याद बाणेवाले यांनी सदर बझार पोलीस ठाण्यात दिली आहे. अधिक तपास पो. नि.माळी हे करत आहेत.

## जिल्ह्यातील बारा शिक्षिकांचा नारीशक्ती सन्मान पुरस्काराने होणार गौरव

### मुख्य कार्यकारी अधिकारी दिलीप स्वामी यांच्या हस्ते पुरस्कारांचे वितरण

सुराज्य/सोलापूर

**स्टेट इनोव्हेशन अ‍ॅन्ड रिसर्च फाऊंडेशन अर्थात सर फाऊंडेशन व महाराष्ट्र वूमन टीचर्स फोरमच्यावतीने जागतिक महिला दिनानिमित्त जिल्ह्यातील बारा कर्तृत्ववान शिक्षिकांचा नारीशक्ती सन्मान पुरस्कार देऊन गौरव करण्यात येणार आहे, अशी माहिती सोलापूर जिल्हा महिला समन्वयक अनघा जहागिरदार यांनी दिली.**

येत्या १ एप्रिल रोजी, सायंकाळी चार वाजता मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद सोलापूर दिलीप स्वामी यांच्या हस्ते या पुरस्काराचे वितरण होणार आहे. या निवडीबद्दल सर फाउंडेशनचे राज्य समन्वयक सिद्धाराम माशाळे, बाळासाहेब वाघ व महिला राज्य समन्वयक हेमा शिंदे वाघ यांनी या पुरस्कार विजेत्यांचे अभिनंदन केले.

यावेळी सो. जि.समन्वयक राजकिरण चव्हाण व नवनाथ शिंदे उपस्थित होते. विजया सुरेश कोळी, अमृता अरविंद कुलकर्णी, सुधामती बापू लोंढे, विजया बलभीम गावडे, अंबिका वामनराव मिठ्ठापल्ली, नर्मदा नरेश कनकी, सुवर्णा सर्जेराव जाधव, सरला धनाजी खाडे, शमा शेखलाल शेख, उषा नेताजी भोसले, विद्या महादेव वरडूळे, राजश्री राजकुमार झिंगाडे यांचा पुरस्कार देऊन सन्मान करण्यात येणार आहे.

# आदिवासींच्या जमिनी गिळंकृत; हजारेंसह तिघांवर गुन्हा दाखल

सुराज्य/सोलापूर

**आदिवासी इसमांच्या नावावर असलेल्या जमिनी ह्या आदिवासी व्यतिरिक्त इतर इसमांना लिलावाशिवाय खरेदी करता येत नाहीत, हे माहीत असूनही आपापसात संगतमत करून फिर्यादी यास कंपनीचा संचालक करतो, नोकरी लावतो असे म्हणून त्यांच्या नावावर नियमबाह्यपणे १ कोटी १० लाख रुपये कर्ज उचलून परतफेड करण्याकरिता दडपण आणत फसवणूक केल्याप्रकरणी तिघांच्या विरोधात सदर बझार पोलीस ठाण्यात फसवणूक तसेच अ‍ॅट्रॉसिटी अंतर्गत गुन्हा दाखल झाला आहे.**

या घटनेची हकीकत अशी की, फिर्यादी अमृत केशव पडवळे (वय-३५, रा. रामपूर खेडपाटा डहाणू, पालघर) हे आदिवासी मागासवर्गीय समाजाचे आहेत. त्यांना विश्वासात घेत २०१४ पासून ते २०२२ या कालावधीत सोलापुरातील जनकल्याण मल्टिस्टेट को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटीचे सर्वेसर्वा राजेंद्र पुंडलिक हजारे (रा. लोकमंगल विहार, बाळे सोलापूर) अमर विजय जाधव (रा. सी वूड इस्टेट, नेरूळ, मुंबई) यशवंत वसंतराव पाटील (रा. अली दादा, इस्टेट, कुर्ला मुंबई) या तिघांनी संगनमत करून कंपनीचे संचालक करतो, असे आमिष दाखवून कर्जत, डहाणू, चिंचल खैरे आधी भागातील जमिनी फिर्यादीच्या नावावर त्यांच्या पैशाने खरेदी केल्यानंतर त्या जमिनी त्यांना कमी पैशात लिलावाद्वारे खरेदी करता याव्यात यासाठी प्रथम कर्जत येथील आदिवासी जमिनीवर फिर्यादी नावे कागदपत्रात चुकीच्या नोंदी करून नियमबाह्य व तातडीने १ कोटी १० लाख रुपये गहाण कर्ज जनकल्याण मल्टिस्टेट को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी या बँकेकडून फिर्यादीच्या परस्पर मंजूर करून घेतले. त्यानंतर ती कर्जाची रक्कम बनावट स्लिप व बनावट रक्कम हस्तांतर पत्राच्या आधारे यशवंत पाटील यांच्या बँक खात्यात फिर्यादीच्या परस्पर जमा केली तसेच आरोपींनी कर्जत येथील जमीन कमी पैशात लिलावाद्वारे विकत घेण्यासाठी ते कर्ज प्रकरण एनपीए करून त्यांच्या अंमलबजावणीसाठी फिर्यादीस पनवेल दिवाणी न्यायालयाची नोटीस पाठवून फिर्यादीने न घेतलेले एक कोटी दहा लाख रुपये कर्जाची रक्कम परतफेड करण्यासाठी दडपण आणले.

यावेळी आपली फसवणूक झाली हे लक्षात आल्यानंतर अमृत पडवळे यांनी तिघांच्या विरोधात सदर बझार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला असून, अधिक तपास सहाय्यक पोलीस आयुक्त प्रांजली सोनवणे या करीत आहेत.

# महिलांना आत्मनिर्भर करण्यासाठी प्रयत्न करणार : बोबडे

सुराज्य/सोलापूर

**जिजाऊ ब्रिगेड व यशस्विनी महिला मंच टेंभुर्णी यांच्यावतीने जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने मोफत महिला आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाची सुरुवात राजमाता जिजाऊ आणि सावित्रीबाई फुलेंच्या प्रतिमा पूजनाने झाली. यावेळी जिजाऊ ब्रिगेड सोलापूर जिल्हा अध्यक्ष शिवमती सुरजा बोबडे, प्रसिद्ध उद्योजिका कमलाताई परदेशी व जिजाऊ ब्रिगेड पदाधिकारी तसेच यशस्विनी महिला मंच बचत गट या सर्व महिला पदाधिकारी उपस्थित होत्या.**

जिजाऊ ब्रिगेड टेंभुर्णी व यशस्विनी महिला मंच टेंभुर्णी यांच्यावतीने महिलांचे आरोग्य सदृढ व्हावे बदलत्या काळात आरोग्याकडे दुर्लक्ष होऊ नये व खर्चाला आळा बसावा या हेतूपोटी या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

अंबिका मसाले या व्यवसायाच्या प्रसिद्ध उद्योजिका कमलाताई परदेशी यांनी उपस्थित महिलांचे प्रबोधन केले. व्यावसायिकतेकडे वळण्यासाठी आपल्या अंगी असलेल्या विविध कलागुणांना संधी उपलब्ध करून देऊन त्याला उद्योजकतेची जोड देत आधुनिक विकासाची कास धरली पाहिजे. कौटुंबिक जबाबदारी पार पाडत आपणही समाजामध्ये उद्योजिका म्हणून मिरविले पाहिजे. याविषयी मोलाचे मार्गदर्शन केले. महिलांमध्ये चेतना निर्माण करणारे प्रबोधन यावेळी पार पडले.

आपल्या भाषणातून जिजाऊ ब्रिगेडच्या जिल्हाध्यक्षा शिवमती सुरजा बोबडे बोलताना म्हणाल्या की, महिलांचे सबलीकरण, व्यवसायिकतेचे महत्व, आर्थिकदृष्ट्या संपन्न, त्यांचे आरोग्य व वैयक्तिक जीवमान उंचवावे याकरिता आम्ही नेहमी कटिबद्ध असतो. यशस्विनी महिला मंच बचत गटाच्या माध्यमातून महिपांना कर्ज उपलब्ध करुन दिले जाते. शासकीय योजनांचे लाभ घेण्याविषयीच्या कार्यशाळाही आयोजित केल्या जातात. यादरम्यान नियोजित लाभार्थी महिलांना



कापूर, अगरबत्ती मशीन, पापड, मसाले इ. यांत्रिक मशीनचे वाटप यावेळी केले गेले. त्याबरोबरच बदलत्या काळात आरोग्याकडे दुर्लक्ष होऊ नये यासाठी मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन केले होते. यामध्ये नेत्र तपासणी, रक्तदाब व शुगर तपासणी, संपूर्ण बॉडी चेकअप, आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील महिलांचे मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया अशा विविध तपासण्या घेण्यात आल्या. जवळपास हजारो महिलांनी याचा लाभ घेतला.

दरवर्षीप्रमाणे याहीवर्षी आपल्या मुलांवरती आदर्श संस्कार करणाऱ्या महिलांना आदर्श माता पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

# शहीद जवान स्मृती सन्मान हा प्रेरणादायी उपक्रम : विखे- पाटील

## करमाळ्यात शहीद जवानांच्या वारसांचा सन्मान

✔ सुराज्य/सोलापूर

दिगंबरराव बागल प्रतिष्ठानने आयोजित केलेला शहीद जवान स्मृती सन्मान उपक्रम प्रेरणादायी व अनुकरणीय आहे, असे प्रतिपादन राज्याचे महसूल, पशु संवर्धन व दुग्ध विकास मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी आज केले. करमाळा येथे आयोजित कृषि प्रदर्शन व दिगंबरराव बागल जयंती महोत्सव कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते.

यशवंतराव चव्हाण महाविद्यालय पटांगण येथे आयोजित या कार्यक्रमास आमदार सर्वश्री रणजीतसिंह मोहिते पाटील, सचिन कल्याणशेट्टी, माजी आमदार हर्षवर्धन पाटील, जिल्हाधिकारी मिलिंद शंभरकर, जिल्हा पोलीस अधीक्षक (ग्रामीण) शिरीष सरदेशपांडे, जिल्हा परिषद प्रभारी मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहिनकर, जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी बाळासाहेब शिंदे, उपविभागीय अधिकारी ज्योती कदम, उपविभागीय पोलीस अधिकारी विशाल हिरे, मकाई कारखान्याचे अध्यक्ष दिग्विजय बागल, आदिनाथ कारखान्याच्या संचालिका रश्मी बागल, विलासराव घुमरे आदि मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते.



यावेळी पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या हस्ते शहीद जवानांचे वारस विमल वारे, प्रवीण जयहिंदे, गंगुबाई देविदास गात, सीताबाई चौधरी, अनुजा व अरविंद निलंगे, संगिता भारत काबंळे, धनाजी परबत यांचा सन्मान करण्यात आला.

पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील म्हणाले, संपूर्ण देश हेच शहिदांचे कुटुंब आहे. त्यामुळे त्यांच्या वारसाचा सन्मान करणे हे आपले कर्तव्य आहे. सन्मान झालेल्या सर्व वारसाच्या शासन सदैव पाठीशी आहे.

पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील म्हणाले, केंद्र सरकारने सर्वात मोठी आर्थिक तरतूद कृषि क्षेत्रासाठी केली आहे. शेती व्यवस्थेमध्ये परिवर्तन होऊन स्थैर्य आले आहे. तीन महिन्यात पाणंद, शिव रस्ते खुले करा. तसेच, मोजणीचे संपूर्ण काम विहित वेळेत पूर्ण करून नकाशे घरपोच करा, असे आदेश संबंधित अधिकाऱ्यांना दिले आहेत, असे त्यांनी सांगितले.

यावेळी राज्याचे पहिले मुख्यमंत्री दिवंगत यशवंतराव चव्हाण यांच्या जयंतीनिमित्त त्यांना मान्यवरांनी अभिवादन केले.

पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी कृषि महोत्सवातील विविध स्टॉलना भेट देऊन पाहणी केली.

तसेच दिगंबरराव बागल यांच्या स्मृती जागृत रहाव्यात, यासाठी उभारण्यात आलेल्या आठवणीतले मामा या कलादालनास भेट देऊन त्यांच्या आठवणींना उजाळा दिला.



## यशवंतराव चव्हाण जयंती वेळापूर येथे साजरी

✔ **वेळापूर** : महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांची ११० वी जयंती वेळापूर ग्रामपंचायत येथे जयंती साजरी करण्यात आली. यावेळी वेळापूर ग्रामपंचायत सरपंच रजनीश बनसोडे व जेष्ठ नेते महादेव म्हेत्रे यांच्या हस्ते प्रतिमा पूजन करण्यात आले . तसेच खाजगी पशु सेवा संघटना माळशिरस तालुका अध्यक्ष डॉक्टर धनंजय म्हेत्रे यांच्या वाढदिवसानिमित्त वेळापूर सरपंच रजनीश बनसोडे यांच्या हस्ते वेळापूर ग्रामपंचायत कार्यालय येथे सत्कार करण्यात आला. यावेळी सरपंच रजनीश बनसोडे, महादेव म्हेत्रे, महाळू म्हेत्रे, डॉ धनंजय म्हेत्रे, नागेश क्षीरसागर, नागेश नाईकनवरे, सुरेश जाधव आदी उपस्थिती होते.



## ऑल इंडिया पेंचर सेना जिल्हा कार्याध्यक्षपदी तसनिम शेख

✔ **अक्कलकोट** : ऑल इंडिया पर सेनेचे संस्थापक राष्ट्रीय अध्यक्ष दिपकभाई केदार यांच्या नेतृत्वात जिल्हाध्यक्ष अमर कॉवांच्या उपस्थितीत हरपुर येथे कार्यकर्ता मेळावा प्रसंगी अक्कलकोट चे तसनिगम शरीफ शेख यांची सोलापूर जिल्हा कार्याध्यक्षपदी निवड करण्यात आली. मा.दिपक केदार भाई यांच्या नेतृत्व व मार्गदर्शनाखाली ऑल इंडिया पॅवर सेनेच्या माध्यमातून दलित, शोषीत, पिंडीत, वंचित, मुस्लिम, बहुजन वर्गाच्या न्याय हक्कासाठी लढत राहीन, जातीवादी व्यवस्था विरोधात संविधान वाचविण्यासाठी लढा तीव्र करेन, जनसामान्याच्या मुलभूत प्रश्नांसाठी आंदोलनात्मक पवित्रा घेवून जनसामान्याचे प्रश्न सोडवेन, दलित मुस्लिम अत्याचार हो राष्ट्रीय आपत्ती सारखी परिस्थिती असून दलित मुस्लिम अत्याचाराविरोधात आवाज उठविण्याचे काम करेन, असे तसनिम शेख यांनी आपले मनोगत व्यक्त केले. याप्रसंगी तानाजी शिवशरण, गोरी छन्नरे, अमर कांबळे, महिंद्र शिरसट, अनिल आगावणे, शुभम क्षिरसागर, अनिल शिरसट व असंख्य कार्यकर्ते उपस्थित होते.

## भंडारकवठे सोसायटीमधील गैर व्यव्हाराची चौकशी करा : भरले



✔ **दक्षिण सोलापूर** : दक्षिण सोलापूर तालुक्यातील भंडारकवठे येथील विविध कार्यकारी सोसायटीची निवडणूक होऊन नऊ महिने झाले. या सोसायटीत ५०० पेक्षा जास्त सभासद असून चार कोटी पेक्षा जास्त उलाढाल आहे. सध्या सदर सोसायटीचा दर्जा अ वर्ग श्रेणीमध्ये असून अशा या चांगल्या चाललेल्या सोसायटीमध्ये मनमानी कारभारामुळे अनेक शेतकरी वंचित आहेत, याची चौकशी करण्याची मागणी संचालक शिवानंद भरले यांनी जिल्हा उपनिबंधक व सहाय्यक निबंधकांकडे केली आहे. नविन सभासद होणाऱ्या शेतकऱ्यांना प्रवेश रक्कम भरल्याचे जमा पावती दिली जात नाही. गेले अनेक वर्षांपासून सचिव वेगळा अन कामकाज पहाणारे निराळेच अशी परंपरा सोसायटीत होताना दिसत आहे. संस्थेचे विद्यमान चेअरमन, व्हा. चेअरमन यांनी राजीनामा दिला असताना सहकार विभागाच्या पोटनियमाप्रमाणे निवडणूक प्राधीकरणाकडून नविन चेअरमन व्हा चेअरमन निवड न करता एका संचालकाला व्यवहार करण्यासाठी अनाधिकृत अधीकार देणे, दुसऱ्याच्या क्षेत्रातील ऊसावर पीक कर्ज वाटप करणे. सभासदाना पीक कर्ज वाटप न करता जुन्या कर्जदारानाच कर्ज वाढवून देणे तसेच संस्थेच्या कामकाजात तफावत आहे, असे भरले यांनी म्हटले आहे. भंडारकवठे विविध कार्यकारी सोसायटीच्या सहकार खाते नियम चौकशी करावी अन्यथा ३१ मार्चपासून सोलापूर जिल्हा उपनिबंधक कार्यालयासमोर आमरण उपोषण करण्याचा ईशारा संचालक शिवानंद भरले यांनी दिला आहे.



## जि.प. शाळा बागेहळ्ळी येथे महिला दिन साजरा

✔ **अक्कलकोट** : जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून जिल्हा परिषद प्राथमिक मराठी शाळा बागेहळळी येथे महिला मेळावा आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी बागेहळळी गावच्या सरपंच इंदुमती माशाळे होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून ग्रामपंचायत सदस्या श्राविका गायकवाड, ग्रामपंचायत सदस्य माडजे या उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जिल्हा परिषद प्राथमिक मराठी शाळेच्या उपक्रमशील शिक्षका राजश्री झिंगाडे यांनी केले .याप्रसंगी शाळेतील मुलींनी विविध कर्तृत्ववान महिलांच्या वेशभूषा करून उपस्थित महिला वर्गांना प्रेरित केले. शाळेतील माता-पालकासह गावातील बहुसंख्य महिलांनी या कार्यक्रमाला हजेरी लावली होती, शाळेच्या वतीने याप्रसंगी महिलांसाठी अनेक मनोरंजन पर स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये उखाणे स्पर्धा ,फुगे फुगवणे स्पर्धा, टिकली लावणेस्पर्धा,संगीत खुर्ची स्पर्धा, लंगडी स्पर्धा घेण्यात आल्या तसेच उपस्थित महिलांमधून एका भाग्यशाली विजेत्या चे कुपन काढून त्या विजेत्या स्पर्धकास साडीचा बहुमान शाळेच्या वतीने देण्यात आला.प्रसंगी शाळेचे मुख्याध्यापक नारायण इरवाडकर यांनी उपस्थित महिलांना महिला सक्षमीकरण व समाजाचा दृष्टिकोन या विषयावर मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विषय शिक्षक बाळू नवगिरे, सहशिक्षक संजय जाधव, सहशिक्षिका राजश्री झिंगाडे, सहशिक्षक सिद्धाराम गायकवाड, विषय शिक्षक समीर कुलकर्णी यांचे परिश्रम लाभले. कार्यक्रमाच्या सांगतेच्या वेळी उपस्थित महिलांनी गरबा नृत्य करून आनंद उत्सव साजरा केला.

## पानमंगरूळ येथील ग्रामदैवत शंभू महादेवाची २१ मार्चपासून महायात्रा; जनावरांचे प्रदर्शन

✔ सुराज्य/अक्कलकोट

प्रतिवर्षाप्रमाणे यावर्षी ही मंगरूळ पान येथील ग्रामदैवत श्री शंभू महादेवाची महायात्रा जनावरांचे बाजार व भव्य प्रदर्शन मंगळवार दि. २१ मार्च ते २६ मार्च दरम्यान संपन्न होणार आहे.

मंगळवार २१ मार्च रोजी श्रीस तैलाअभिषेक व रात्रौ ८ वाजता श्री.म.नि.प्र. शिवानंद महास्वामीजी विरक्त मठ करजगी व श्री. ष. ब्र. शिवयोगी शिवाचार्य महास्वामीजी, हिरेमठ मंगरुळ व नाविदगी यांच्या हस्ते अग्नी प्रज्वलन व रात्री १० वा. विठ्ठल रुक्मिणी देवस्थानतर्फे हरीभजन.

बुधवार २२ मार्च रोजी सकाळी ६ वाजता श्रीस महारुद्राभिषेक सकाळी ७ वा. श्री. ष. ब्र. शिवयोगी शिवाचार्य महास्वामीजी, हिरेमठ मंगरुळ व नाविदगी यांच्या हस्ते धर्म ध्वजारोहण सोहळा, सकाळी ९ वाजले पासून पालखी व नंदीकोल मिरवणूक आणि पुरवंतांचे नमृत्व खेळ व दुपारी १ वाजता अग्निप्रवेश आणि रात्री दहा वाजता श्री महादेव नाट्य संघ, मंगरुळ यांजकडून कन्नड सामाजिक नाटक बडवन वडीलू बेंकीय सिडीलु अर्थात ताळी मोदलु ताई मोदलु.

गुरुवार २३ मार्च रोजी सकाळी सहा वाजता श्री ची महापूजा नऊ वाजल्यापासून सुवासिनींचे कुंभ मिरवणूक व श्रीस कुंभाभिषेक रात्री ८ वाजता डॉ. अशोक हिप्परगी यांच्या हस्ते शोभेचे दारू काम, रात्री ९ वाजले पासुन कलगी तुरईचे गाणे.

शुक्रवार २४ मार्च रोजी सकाळी सहा वाजता श्रीस रुद्राभिषेक सकाळी ०९ वाजता कलगीतुराचे कन्नड गाणे रात्री १० वाजता कन्नड सामाजिक



नाटक बडवन वडीलू बेंकीय सिडीलु अर्थात ताळी मोदलु ताई मोदलु.

शनिवार २५ मार्च रोजी सकाळी सहा वाजता श्रींची महापूजा ०९ वाजता कलगीतुराचे कन्नड गाणे सायंकाळी ०५ वाजता बैलगाड्यांची भव्य शर्यत

रविवार २६ मार्च रोजी सकाळी ०६ वाजता श्रीस महापूजा व सकाळी ११ वाजता जनावरांचे बक्षीसासाठी निवड करणे. यावेळी पशुवैद्यकीय अधिकारी उपस्थित राहणार आहेत. बक्षीस वितरण समारंभ सरपंच रत्नाबाई महाजन यांच्या अध्यक्षतेखाली व पानमंगरुळचे ग्रामविकास अधिकारी शिवानंद सोलापुरे यांच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात येणार आहे. सायंकाळी ०५ वाजता कर्नाटक व महाराष्ट्रातील नामांकित मल्लांच्या जंगी कुस्त्या संपन्न होणार आहे. यात्रेच्या कालावधीत महाप्रसाद वाटप असणार आहे.

तरी या यात्रेचा लाभ सर्व सदभक्तांनी घ्यावा व पशुपालकाने प्रदर्शनासाठी जनावरांच्या खरेदी विक्रीसाठी आपले पशु मोठ्या संख्येने प्रदर्शनास आणावे असे आव्हान यात्रा कमिटीने केले आहे.

## ईपीएस पेंशनधारकांचा १४ मार्चला तामलवाडीत मेळावा

✔ सुराज्य/मोहोळ

ईपीएस १९९५ पेन्शनधारकांचा १४ मार्च रोजी तामलवाडी ता. तुळजापूर येथे भव्य मेळाव्याचे आयोजन करण्यात आले असून धाराशीव सोलापूर लातूर असा तीन जिल्हयातील पेन्शन धारकासाठी हा मेळावा होत असल्याची माहीती राज्य सचिव शशिकांत ठोकळे यांनी दिली.

या मेळाव्याचे उद्घाटन खा ओमराजे निंबाळकर यांच्या हस्ते होणार असून या मेळाव्यात संघटनेचे राष्ट्रीय विधी सल्लागार इजि दादा झोडे नागपूर हे प्रमुख वक्ते म्हणून उपस्थित राहणार आहेत यावेळी कोर्टाचा निकाल व ईपीएफओचे परिपत्रक व मद्रास हायकोर्टचा पेंशन वाढी संबधी निकाल या बाबत कायदेशीर उपयुक्त माहीती व मार्गदर्शन तसेच ऑनलाईन फॉर्म भरणे २६ (६) ११ (४) ११ (३) हे विकल्प फॉर्म कसा भरावयाचा तसेच ३ फॉर्म भरणे संबंधी माहीती दिली जाणार आहे.

एस.टी. महामंडळ वीज महामंडळ साखर कारखाने सुत कापड गिरण्या दुध संघ खाजगी बॅका इंजि कॉलेजमधील सर्व ईपीएस पेंशन धारकांनी याचा लाभ घ्यावा हा मेळावा १४ मार्च रोजी मंगळवारी तामलवाडी ता तुळजापूर जि धाराशीव या ठिकाणी होणार असून या मेळाव्यास लातूर धाराशीव सोलापूर जिल्हयातील पेंशन धारकांनी उपस्थित रहावे असे अवाहन विभागीय सचिव इंजि शशीकांत ठोकळे सोलापूर जिल्हा अध्यक्ष हरिभाऊ नरखेडकर धाराशीव अध्यक्ष बसवराज मसूते कार्याध्यक्ष मुरलीधर हंबीरे यांनी केले आहे .

## मोटरसायकल पळवली

✔ **सोलापूर** : सोलापूर (प्रतिनिधी) नवीन आरटीओ ऑफिस समोरील सिल्वर ओक बिल्डिंगच्या पार्किंग मध्ये पार्क करून ठेवलेली मोटरसायकल क्रमांकएम.एच.१३.डीव्ही.१६७० ही अज्ञात चोरट्याने चोरून नेली. प्रसाद विजय जाधव (रा.रामवाडी,सोलापूर) हे जिम करण्याकरिता सिल्वर ओक बिल्डींग मध्ये गेले होते. तेथे त्यांनी आपली गाडी पार्क करून ठेवली असताना ती चोरून नेली.



## इंटरनॅशनल स्कूलच्या विद्यार्थ्यांची शिवप्रसाद डेरी व जैन मंदिर क्षेत्रभेट

✔ सुराज्य/नातेपुते

नातेपुते येथील एस एन डी इंटरनॅशनल स्कूलच्या ४०० विद्यार्थ्यांची दहिगाव तालुका माळशिरस येथील शिवप्रसाद डेअरीस औद्योगिक व श्री १००८ महावीर स्वामी दिगंबर जैन मंदिरास क्षेत्रभेटीचे आयोजन स्कूलचे मुख्याध्यापक संदीप पानसरे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले होते.

शिव प्रसाद डेअरीचे व्यवस्थापक रमेश मोरे, सोलापूर जि. प. सदस्या ऋतुजा मोरे. अश्विनी मोरे तसेच मॅनेजर दशरथ शेंडे, विजय वाघोले, लॅब केमिस्ट भावना वाघमारे, मोनिका नागरे यांनी विद्यार्थ्यांना डेअरी प्रकल्पातील सर्व घटकांची सूक्ष्म माहिती दिली. डेअरीत दूध आल्यापासून त्यावर केल्या जाणाऱ्या सगळ्या प्रकारच्या प्रक्रिया, त्यापासून तयार होणारे दही, ताक, पनीर, लस्सी यांची सविस्तर माहिती दिली.तसेच सर्व विद्यार्थ्यांना शिवप्रसाद डेअरीच्या वतीने त्या ठिकाणी तयार करण्यात येणारे श्रीखंड पेढे व आईस्क्रीम अल्प उपहार म्हणून खाण्यास दिले. तदनंतर दहिगाव येथील श्री १००८ महावीर स्वामी दिगंबर जैन मंदिरास क्षेत्रभेट दिली. मंदिरातील सुबक व कोरीव महावीर स्वामी यांची मूर्ती विद्यार्थ्यांना पाहावयास मिळाली सर्व विद्यार्थ्यांनी नतमस्तक होऊन दर्शन घेतले.

जैन मंदिरातील विनोद किरकिरे यांनी मंदिराचा इतिहास व दहिगाव तीर्थक्षेत्र याविषयी थोडक्यात माहिती सांगितली शिवप्रसाद डेरी व जैन मंदिर क्षेत्रभेटी साठी मुख्याध्यापक संदीप पानसरे, स्कूलचे शिक्षक शकूर पटेल, रवींद्र वेदपाठक, मनोज राऊत, हरिदास गोरवे, आदित्य दाभोळे, आसिफ शेख शिक्षिका सारिका पानसरे, सारिका पालवे, योगिता पालवे, निशा होळकर ,जस्मिन काझी यांनी परिश्रम घेतले.

## 'सुराज्य'चे शिवाजी हळणवर आदर्श कृषी पत्रकार पुरस्काराने सन्मानित

✔ सुराज्य/सोलापूर

महाराष्ट्र राज्य ऊस उत्पादक संघाच्या वतीने रविवारी बामणी (ता. कागल, जि. कोल्हापूर) येथे दै.सुराज्य चे जिल्हा प्रतिनिधी शिवाजी हळणवर यांना 'राज्य स्तरीय आदर्श कृषी पत्रकार पुरस्कारा'ने सन्मानित करण्यात आले.यावेळी कष्टातून शेतीत प्रगती साधणाऱ्या राज्यभरातील शेतकऱ्यांच्या सन्मानाचा गौरव सोहळ्यात उसाचे विक्रमी उत्पादन घेणाऱ्या राज्यातील २५ शेतकऱ्यांना ऊसभूषण, ऊसविकास कार्यगौरव पुरस्कार देवून गौरविण्यात आले.




महाराष्ट्र राज्य ऊस उत्पादक संघाच्या वतीने राज्य भरातील आदर्श ऊस उत्पादन घेणाऱ्या शेतकऱ्यांचा विशेष सन्मान करीत 'महाराष्ट्र ऊस भुषण कार्य गौरव पुरस्कार' देवून त्यांचे प्रोत्साहन वाढविले जाते. त्याच बरोबर शेती आणि शेतकऱ्यांच्या समस्या, उपाय हे आपल्या लेखणीच्या माध्यमातून शासन दरबारी मांडून आवाज उठविणारे शिवाजी हळणवर व कोल्हापूरचे राजकुमार चौगुले व इतर

पुरस्कारार्थींना स्मृतीचिन्ह, सन्मानपत्र व सपत्नीक सन्मानित करण्यात आला या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संघाचे संस्थापक अतुल माने पाटील होते.

यावेळी केळी उत्पादक संघाचे अध्यक्ष किरण चव्हाण, उत्तम परिट, राजेंद्र डुचे पाटील आदीसह पदाधिकारी उपस्थित होते.

राज्यातील ऊस शेती करणाऱ्या शेतकऱ्यांची आजची परिस्थिती नाजूक झाली असून शेतीतील समस्या वाढत आहेत.

यावर योग्य मार्गदर्शन करण्यासाठी ऊस विकास परिषदेचे आयोजन करण्यात आले असून यावेळी अधुनिक ऊस तंत्रज्ञान यावर संजिव माने यांचे 'एकरी १०० टन सहज शक्य' याविषयी तर उत्तमराव परिट यांचे 'आदर्श ऊस शेती' यावर आणि संतोष सहाणे यांचे सेंद्रिय शेती याविषयी मार्गदर्शन केले. या विकास परिषदेस ऊस उत्पादक शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## सांगोला नगरपरिषदेच्या वतीने महिलांसाठी विविध स्पर्धा

✔ सुराज्य/सांगोला

सांगोला नगरपरिषदेच्या वतीने महिला दिनानिमित्त शहरातील महिलांसाठी विविध स्पर्धेंचे आयोजन करण्यात आले. यामध्ये पाककला स्पर्धा,रांगोळी स्पर्धा, महिलांचे ग्रुप डान्स स्पर्धा व होम मिनिस्टर यासारख्या स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते.



दिनांक २ मार्च रोजी पाककला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये शहरातील ५१ स्पर्धकांनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदविला. या स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून डॉ.सुधीर गवळी, मुख्याधिकारी, शिवाजीराव शिंदे, तालुका कृषी अधिकारी, छाया यादव मॅडम यांनी काम पाहिले. पाककला स्पर्धेत प्रथम क्रमांक स्नेहल मडके, द्वितीय क्र. स्वाती ढोले, तृतीय क्र. गीता दौंडे यांचा तर उत्तेजनार्थ म्हणून अपर्णा एडगे, स्वाती गुळमिरे व शुभांगी तेली यांचा क्रमांक आला. यानंतर दि. ३ मार्च रोजी रांगोळी स्पर्धे चे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये शहरातील ३५ स्पर्धकांनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदविला. या स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून राजेंद्र जाधवसर, पल्लवी थोरात , कविता पाटील यांनी काम पाहिले. प्रथम क्रमांक रेश्मा दिवटे, द्वितीय क्र. वैजंती दौंडे, तृतीय क्र. श्रध्दा तेली यांचा तर उत्तेजनार्थ म्हणून गायत्री पाटणे, अश्विनी घोंगडे, कल्याणी बेडके यांचा क्रमांक आला. दि. ०९ मार्च रोजी ग्रुप डान्स स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. यामध्ये १० ग्रुप तर प्रेक्षक म्हणून ५०० ते ६०० इतक्या महिला उपस्थित होत्या. डान्स स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांक जय हो ग्रुप, द्वितीय क्र. लयभारी ग्रुप, तृतीय क्र. शौर्य ग्रुप यांचा तर उत्तेजनार्थ म्हणून शिवकन्या ग्रुप, मिलेनियम ग्रुप यांचा क्रमांक आला. यामध्ये परीक्षक म्हणून सतीश गेजगेसर व गौरी राऊत हे उपस्थित होते. दि. १० मार्च रोजी होम मिनिस्टर,व्याख्यान व बक्षीस वितरण इ. कार्यक्रम घेण्यात आले. यावेळी योजना मोहिते यांनी ८ मार्च निमित्त लिंग भेदभाव याविषयी व्याख्यान दिले. यावेळी होम मिनिस्टर या मजेदार खेळाच्या माध्यामातून तीन स्पर्धकांना पैठणी भेट देण्यात आली. लकी ड्रॉच्या माध्यमातून उपस्थितांना विविध बक्षिसांचे वाटप करण्यात आले. उपरोक्त प्रथम, द्वितीय, तृतीय व उत्तेजनार्थ स्पर्धकांना मान्यवरांच्या हस्ते सन्मानचिन्ह व बक्षीसाच्या रक्कमेच्या धनादेशाचे वितरण करण्यात आले.

# समृद्धी महामार्गावर भीषण अपघात

## सिंदखेडराजाजवळ कार उलटून ६ ठार, ५ गंभीर जखमी

सुराज्य/बुलढाणा

**समृद्धी महामार्ग मृत्यूचा सापळा बनत चालला आहे. या मार्गावर रविवारी सिंदखेड राजा-दुसरबीड दरम्यान भीषण अपघात झाला. यात सहा जण ठार तर पाच जण गंभीर जखमी झाले आहेत.**

समृद्धी महामार्ग मृत्यूचा सापळा बनत चालला आहे. या मार्गावर रविवारी सिंदखेड राजा - दुसरबीड दरम्यान भीषण अपघात झाला. यात सहा जण ठार तर पाच जण गंभीर जखमी झाले आहेत. हे सर्व एकाच परिवारातील असल्याची माहिती समोर येत आहे. समृद्धी महामार्ग सुरु झाल्यापासून ४० हून अधिक अपघात झाले असून हा त्यातील सर्वात गंभीर अपघात मानला जात आहे.

**कुठे झाला अपघात?**

समृद्धी महामार्गावर मेहकर ते सिंदखेड राजा दरम्यान लोणार तालुक्यातील शिवणी पिसा येथे इर्टिंगाला भीषण अपघात झाला आहे.

या अपघातात सहा जण जागीच ठार झाले. तर पाच जण गंभीर जखमी झाले आहेत. जखमींना मेहकर येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. बहुतांश जखमी तसेच मृत हे छत्रपती संभाजीनगरमधील एन-११ येथील रहिवाशी असल्याची माहिती आहे.

**कसा झाला अपघात?**

हा अपघात रविवारी सकाळी लोणार तालुक्यातील शिवणी पिसा ते दुसरबीड दरम्यान झाला. भरधाव वेगातील इर्टिगा रस्त्यावरील डिव्हायडरला जाऊन धडकली आणि गाडी तीन ते चार पलट्या मारून दुसऱ्या बाजूच्या रस्त्यावर उलटली. या अपघातामध्ये चार जण घटनास्थळीच ठार झाले तर दोन जणांचा रुग्णालयात उपचारादरम्यान मृत्यू झाला.

महामार्गावर दुर्घटना घडल्यानंतर क्विक रिस्पॉन्स टीम दाखल होईल असं म्हटलं गेलं होतं. मात्र रविवारी अपघात घडल्यानंतर तासभर हे पथक घटनास्थळी पोहोचलं नाही, अशी स्थानिकांची तक्रार आहे. कोणाचीही मदत अपघातग्रस्तांना झालेली नाही. बचावपथक वेळेवर दाखल झाले असते तर काही जखमींना वाचवण्यात यश आले असते, असंही स्थानिकांचे म्हणणे आहे.



### लोकार्पणापासून ४० अपघात

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा महत्त्वाकांक्षी प्रकल्प नागपूर ते मुंबई समृद्धी महामार्ग शिर्डीपर्यंत तयार झाला आहे. या मार्गाचे लोकार्पण पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या हस्ते झाले आहे. समृद्धी महामार्गाचे लोकार्पण झाल्यापासून आतापर्यंत ४० हून अधिक अपघात झाले आहे. यात रविवारी सकाळी झालेला अपघात सर्वात मोठा मानला जात आहे. या अपघातात सहा जणांचा मृत्यू झाला आहे, तर पाच जण गंभीर जखमी आहेत.



## मीरा भाईंदरमध्ये हिंदू जन आक्रोश मोर्चा

सुराज्य/मुंबई

**'लव्ह जिहाद आणि लँड जिहाद' कायद्याच्या मागणीसाठी हिंदुत्ववादी संघटनांकडून मीरा भाईंदरच्या मुख्य मार्गांवरून मोर्चा काढण्यात आला होता. यात हिंदूवादी संघटनेसह भाजप आणि मनसेचे कार्यकर्ते मोठ्या प्रमाणावर सहभागी झाले होते.**

लव्ह जिहाद आणि धर्मांतर विरोधी कायद्याच्या मागणीसाठी हिंदू जनआक्रोश मोर्चाचे राज्यभर सध्या आयोजन करण्यात आले आहे. त्याचाच भाग म्हणून रविवारी मीरा भाईंदरच्या मुख्य मार्गांवर मोर्चा काढण्यात आला होता. सध्या लव्ह जिहादची प्रकरणे वाढत आहेत. हिंदू मुलींचे धर्मांतर करून फसवणूक व शोषण केले जात आहे. याच शिवाय हिंदू लोकांच्या जागेवर मोठ्या प्रमाणात कब्जा केला जात आहे. त्यामुळे याविरोधात काही हिंदुत्ववादी संघटनांनी एकत्र येऊन सकल हिंदू समाजातर्फे हा मोर्चा आयोजित केला होता.

यामध्ये भाजप आमदार नितेश राणे, आमदार गीता जैन, माजी आमदार नरेंद्र मेहता, समाज माध्यमांवर प्रसिद्ध असलेली काजल हिंदुस्थानी आणि मोठ्या संख्येने नागरिक सहभागी झाले होते. सोबत मोर्चात हातात भगवे झेंडे आणि लव्ह जिहाद आणि धर्मांतराच्या विरोधातील मजकूर असलेले फलक होते आणि सातत्याने 'जय श्री राम'चा नारा दिला जात होता.

---

# केवळ ९० मिनिटांत मुंबईहून पुणे गाठता येणार

सुराज्य/मुंबई

**मुंबई ट्रान्स हार्बर लिंक अर्थात एमटीएचएल प्रकल्प आतापर्यंत ९२ टक्के पूर्ण झाला असून २०२३ पर्यंत हा पूल उद्घाटनासाठी सज्ज होणार असल्याची शक्यता आहे. दक्षिण मुंबई आणि नवी मुंबईतील प्रवाश्यांना मोठा दिलासा मिळणार आहे. दरम्यान, आता मुंबई ट्रान्स हार्बर लिंकमुळे अवघ्या ९० मिनिटांत पुणे आणि गोवा गाठता येणार आहे. दरम्यान, एमएमआरडीएने संबंधित कामांसाठी कंत्राटदार नेमण्यासाठी निविदा काढल्या आहेत.**

मुंबई-पुणे एक्सप्रेसवेला जोडणारा ट्रान्स हार्बर लिंक मार्ग ७३५ किलोमीटरचा असून त्याचा खर्च तब्बल १ हजार ३५२ कोटी इतका आहेत. तर, या मार्गावर ३+३ लेन आहेत. प्रस्तावित कॉरिडॉरमुळं मुंबई-पुणे एक्सप्रेसवेवरील वाहतूककोंडीची समस्या सुटेल. तसंच मुंबईतून अवघ्या ९० मिनिटांत पुणे गाठता येणार आहे.

मुंबई ट्रान्स हार्बर लिंकमार्ग राष्ट्रीय महामार्ग ३४८ येथील चिरले येथे संपतो.

एनएच - ३४८ येथे मोठे ट्रक आणि कंटेनरमुळं नेहमीच वाहतूक कोंडी असते. तसंच जेएनपीटी पोर्टमुळं ही वाहतुकीची समस्या कायम असते. म्हणून एनएच - ३४८ ला मुंबई ट्रान्स हार्बर लिंक जोडण्यात येत आहे. यामुळं इथली वाहतूक कोंडीची समस्या सुटेल. मुंबई ट्रान्स हार्बरवरील शेवटचं ठिकाण असलेल्या चिरले येथून हा प्रस्तावित मार्ग सुरू होऊन गावठाणपाडा आणि पळसपे फाटा येथून मुंबई एक्स्प्रेस वेला जोडतो.



या प्रस्तावित महामार्गाची लांबी चिरले ते पळसपेपर्यंत ४.६ ते २.७५ किमीपर्यंतची असेल.

सध्या हा मार्ग मुंबईतील सेवरी आणि नवी मुंबईतील चिलरे यामध्ये निर्माणधीन आहे. २२ किमी लांबीच्या या मार्गावरील १६.५० किलोमीटरचा भाग पूर्णपणे समुद्रावर आहे. तर ५.३ किलोमीटरचा भाग जमिनीवर आहे.

मुंबईतील सेवरी आणि सेवरी आणि नवी मुंबईतील चिरले येथे आंतररस्ता जोडणी आहे. मुंबई ट्रान्स हार्बरलिंक येत्या डिसेंबरपर्यंत पूर्ण होण्याचा अंदाज आहे. त्याचबरोबर या मार्गावरुन दररोज ७० हजार गाड्या धावू शकणार आहेत.

# नाशिकमध्ये पंचवटीत हल्ल्याचा थरार, हातात कोयता अन् बंदुकीतून गोळीबार

सुराज्य/नाशिक

**जुन्या वादाच्या कुरापतीवरून थेट एक जणावर हल्ला करत त्याच्या घरावर गोळीबार केल्याची घटना नाशिकच्या पंचवटी पोलीस ठाण्याच्या हद्दीत असलेल्या फुलेनगर भागात घडली आहे. गोळीबारात एक महिला जखमी झाली आहे. या घटनेमुळे परिसरातील नागरिकांमध्ये मोठ्या प्रमाणात घबराटीचे वातावरण निर्माण झाले आहे.**

नाशिक शहरातील पंचवटीत असलेल्या फुलेनगर परिसरात जुन्या वादातून थेट एका घरात घुसून महिलेवर आणि तिच्या मुलावर कोयत्याने हल्ला करत गोळीबार करण्यात आला आहे. या गोळीबारमध्ये महिलेच्या अंगाला गोळी चाटून गेल्याने ती जखमी झाली आहे. उषा महाले असे या घटनेत जखमी झालेल्या महिलेचे नाव आहे.

दरम्यान, गोळीबाराची ही संपूर्ण घटना सीसीटीव्हीमध्ये टिपली गेली आहे. शनिवारी रात्री



आठ वाजण्याच्या सुमारास फुलेनगर परिसरात दयानंद महाले यांचा मुलगा चौकात बसलेला होता. जुन्या भांडणाच्या कुरपतीवरून येथे ७-८ जणांच्या टोळक्याने त्याच्यावर कोयत्याने हल्ला चढवला. यात त्याने हा वार हुकून घराकडे पळ काढला. एवढ्यावर न थांबता हल्लेखोरांनी थेट महाले यांच्या घरावर हल्ला करत गोळीबार केला. तर जाब विचारण्यासाठी आलेल्या उषा महाले यांच्या दिशेनेही हल्लेखोरांनी बंदुकीतून गोळीबार केला. सुदैवाने उषा महाले यांच्या छाती जवळून ही गोळी चाटून गेल्याने त्या थोडक्यात बचावल्या आहेत.

# डॉक्टरला लाच स्वीकारताना रंगेहाथ पकडले

सुराज्य/धाराशीव

**शासकीय दवाखान्यात भाडेतत्त्वावर लावलेल्या दोन गाड्यांच्या लॉग बुकवर सही करण्यासाठी वैद्यकीय अधिकारी म्हणून कार्यरत असलेल्या एका डॉक्टरने लाच मागितली. तर त्याच्या सेवकाने ७ हजार रुपयांची लाच स्विकारली. त्यामुळे त्या दोघा लाचखोरांवर लाचलुचपत प्रतिबंध कायद्यांतर्गत गुन्हा नोंद करण्यात आला आहेत.**

याबाबत पोलीस सूत्राकडून मिळालेली अधिक माहिती अशी



की, 'उमरगा येथील उपजिल्हा रुग्णालयात कंत्राटी तत्त्वावर कार्यरत असलेले वैद्यकीय अधिकारी डॉ. तानाजी शंकर राठोड (वय - ४२ वर्षे, रा. न्यू बालाजी नगर, उमरगा) यांनी या रुग्णालयामध्ये भाडेतत्त्वावर लावलेल्या दोन गाड्यांचे मागील ६ महिन्यांचे रखडलेले बिल देण्यासाठी त्या वाहनांच्या लॉग बुकवर सही करण्यासाठी डॉ राठोड यांनी ७ हजार रुपयांच्या लाचेची मागणी केली. तर सेवक राजू राम थोरात (वय- ३५ वर्षे, अपघात विभाग, रा. उपजिल्हा रुग्णालय शासकीय निवारस्थान, उमरगा) यांनी ७ हजार रुपयांची रक्कम पंचासमक्ष स्विकारली.

यावेळी सापळा लावलेल्या पोलिसांनी थोरात यांना रंगेहाथ पकडून राठोड व थोरात यांच्या विरोधात लाचलुचपत प्रतिबंधक गुन्हा नोंद व कलम पोलीस ठाणे, उमरगा गु.र.नं. १३१ / २०२३ कलम ७ प्र अधि. सन १९८८ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# भाजप आमदार बंटी भांगडियांवर विनयभंगाचा गुन्हा दाखल

सुराज्य/चंद्रपूर

जिल्ह्यातील चिमूर विधानसभेचे भाजप आमदार किर्तीकुमार भांगडिया यांच्यावर विनयभंगाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. चंद्रपूर येथील काँग्रेस जिल्हा सरचिटणीसाचा भाऊ आणि त्यांच्या पत्नीला मारहाण केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पीडितेने दिलेल्या तक्रारीनुसार, पीडिता आणि त्यांचे पती साईनाथ बुटके हे चिमूर येथे राहतात. साईनाथ यांचे मोठे बंधू गजानन बुटके हे काँग्रेसचे जिल्हा सरचिटणीस आहेत. दि. ११ रोजी सायं. ७.३०च्या सुमारास भांगडिया हे त्यांच्या कार्यकर्त्यांसह बुटके यांच्या घराच्या बाहेर आले. त्यांनी बुटके यांना शिवीगाळ करून त्यांच्या घरात जबरदस्तीने शिरले आणि साईनाथ यांना मारहाण करत बाहेर घेऊन आले. या मारहाणीला विरोध केला असता, त्यांचा विनयभंग केला आणि मारहाण केल्याचा आरोप पीडितेने केला आहे.

## पुणे-लोणावळा लोकल सेवेला ४५ वर्षे पूर्ण

सुराज्य/पुणे : पुणे-लोणावळा मार्गावरील लोकल सेवेला शनिवारी ४५ वर्षे पूर्ण झाली. या निमित्ताने विशेष कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. अतिरिक्त विभागीय व्यवस्थापक ब्रिजेशकुमार सिंह यांच्या उपस्थितीत ईएमयू डेपोमध्ये हा कार्यक्रम झाला. डेपोसह लोकल गाडीही फुलांनी आकर्षकरीत्या सजवण्यात आली होती.

## लाच स्वीकारताना दोघांचा करेक्ट कार्यक्रम

सुराज्य/अकोला : अकोला रेल्वे स्थानकावर दक्षिण मध्य रेल्वेच्या नांदेड रेल्वे मंडळांतर्गत येत असलेल्या आरपीएफचे निरीक्षक मुकेश कुमार मीना यांना एक लाख रुपयांची लाच घेताना नागपूर 'सीबीआय'च्या पथकाने रंगेहाथ अटक केली आहे. याशिवाय या प्रकरणात मध्यस्थी करणाऱ्या आणखी सुरेश चंदन नामक व्यक्तीला अटक करण्यात आली आहे. या दोन्ही आरोपींना नागपूरला नेण्यात आले आहे. या दोन्ही आरोपींना अमरावतीच्या सीबीआयच्या न्यायालयानं १४ मार्चपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे. तक्रारदाराच्या वडिलांविरूद्ध आरपीएफ पोलिसांनी गुन्हा दाखल केला होता. त्या गुन्ह्यामध्ये अटक न करता जामिनावर सोडण्यासाठीचा अभिप्राय न्यायालयात देण्याच्या बदल्यात ठाणेदार मुकेशकुमार मीना याने ३ लाख रूपयांची मागणी केली होती.

## एच३एन२चे रुग्ण वाढले

सुराज्य/मुंबई : कोरोनाचा प्रादुर्भाव कमी झाल्यानंतर जगभरातून आनंद व्यक्त झाला. परंतु, आता आणखी एक विषाणू डोकं वर काढतोय. देशातसध्या एच३एन२ एन्फ्लुएन्झाचा संसर्ग वाढला असून याची बाधा लहान मुलं, प्रौध व्यक्तींना होतोय. या आजाराची लक्षणेही कोरोनासारखीच असल्याने हा आजारही वेगाने पसरतोय. त्यातच, आता शाळकरी विद्यार्थ्यांच्या परीक्षा सुरू असल्याने पालकांकडून चिंता व्यक्त केली जात आहे.

एच३एन२ हा विषाणू नवीन नाही. १९६५ मध्ये या विषाणूचा पहिला रुग्ण सापडला होता. इतर विषाणूप्रमाणेच या विषाणूनेही आपल्या संरचनेत अनेक बदल केले. हिवाळ्यात या विषाणूचा अधिक प्रसार होतो. गेल्या काही महिन्यांपासून मुंबईसह अनेक शहरांत खोकल्याने अनेकजण ग्रासले होते. आजही खोकल्यामुळे अनेकजण हैराण आहेत. याबाबत एम्सचे माजी संचालक डॉ. रणदीप गुलेरिया यांनीही चिंता व्यक्त केली आहे. ते म्हणाले की, काही वर्षांपूर्वी एच१ एन१ विषाणूचा आजार पसरला होता. आता याच विषाणूचा प्रसारित स्ट्रेन म्हणजे एच३ एन२ आहे. विषाणू म्युटेट झाल्याने आता या विषाणूचे रुग्ण आढत आहेत.

## 'पंतप्रधान आवासमधून राहुल यांना घर द्या'

सुराज्य/मुंबई : माझ्याकडे स्वतःचं घर नाही, हे वाक्य काँग्रेस खासदार राहुल गांधी यांच्याकडून अनेकदा ऐकायला मिळालं आहे. अनेक सभांमध्ये ते या गोष्टींचा उल्लेख करतात. अलिकडेच छत्तीसगडमधल्या रायपूर येथील काँग्रेसच्या ८५ व्या महाअधिवेशनात काँग्रेसचे माजी अध्यक्ष राहुल गांधी म्हणाले होते की, 'माझं वय ५२ वर्ष आहे. परंतु माझ्याकडे अद्याप स्वतःचं घर नाही. यानंतर छत्तीसगडच्या बेमेतरा येथील भाजप नेते देवदास चतुर्वेदी यांनी प्रशासनाला एक पत्र लिहिलं आहे. यात त्यांनी राहुल यांना पीएम आवास योजनेअंतर्गत घर देण्याची मागणी केली आहे.'

## मुलायमसिंह व शरद यादव यांना श्रद्धांजली

सुराज्य/नवी दिल्ली : राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचं तीन दिवसीय शिबीर रविवारी सुरू झालं आहे. या शिबीरात समाजवादी पार्टी प्रकरणी मुलायम सिंह यादव आणि शरद यादव यांना आदरांजली वाहिली आहे. त्याचप्रमाणे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची आई हिराबेन, अभिनेते, दिग्दर्शक सतीश कौशिक यांनाही आदरांजली वाहण्यात आली आहे. बैठकीच्या पहिल्या सत्रात आरएसएसचे सरकार्यवाह दत्तात्रय होसबळे यांनी ज्या प्रसिद्ध व्यक्तींचं निधन झालं, त्यांची नावं वाचली आणि त्यांना सगळ्यांनी आदरांजली वाहिली.

# 'आम्ही गद्दार आहोत', कडू यांचे ठाकरेंना उत्तर

सुराज्य/मुंबई : राज्यात शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस, काँग्रेससह मित्रपक्षांनी महाविकास आघाडी निर्माण करत २०१९ मध्ये सत्ता स्थापन केली होती. परंतु ७ महिन्यांपूर्वी शिवसेनेचे आमदार एकनाथ शिंदे यांच्यासह पक्षातील ४० आमदार फुटले आणि त्यांनी आमदारांचा नवा गट स्थापन केला. परिणामी राज्यातलं आघाडी सरकार कोसळलं. एकनाथ शिंदेंच्या नव्या गटाने भाजपसोबत नवं सरकार स्थापन केलं. एकनाथ शिंदे यांनी बंडखोरी केली तेव्हा शिवसेनेचा सत्तेतला मित्रपक्ष असलेल्या प्रहार जनशक्ती पक्षाचे आमदार बच्चू कडूदेखील शिंदेंसोबत उभे राहिले. या सर्व आमदारांवर शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे, युवासेना अध्यक्ष आणि आमदार आदित्य ठाकरे सातत्याने टीका करत आहेत.



बंडखोर आमदारांना 'गद्दार' आमदार म्हणत आहेत. दरम्यान, बच्चू कडू यांनी उद्धव ठाकरे यांच्या टीकेला उत्तर दिलं आहे.

अचलपूरचे आमदार बच्चू कडू म्हणाले की, 'काहीजण आम्हांला गद्दार म्हणतात. बिलकूल आम्ही गद्दार आहोत. आम्ही नेत्यांचे गद्दार आहोत, जनतेचे नाही. असं म्हणत कडू यांनी उद्धव ठाकरे यांच्या टीकेला उत्तर दिलं आहे. बच्चू कडू म्हणाले की, 'हा बच्चू कडू नेत्यांची गुलामगिरी करणाऱ्यातला नाही.'

दरम्यान, यावेळी बच्चू कडू यांनी कार्यकर्त्यांना निष्ठेचा मूलमंत्रदेखील दिला. कडू म्हणाले की, 'तुम्ही नेत्यांवर निष्ठा ठेवू नका. बच्चू कडूंवर निष्ठा ठेवू नका. कोणत्याही पक्षावर ठेवू नका. केवळ तुमच्या वडिलांवर निष्ठा ठेवा, छत्रपती शिवाजी महाराजांवर निष्ठा ठेवा.'

# भाडे नियंत्रण कायदा व्यावसायिक भाडेकरारांनाही लागू

## मुंबई उच्च न्यायालयाचा निर्वाळा

सुराज्य/मुंबई

**भाडेनियंत्रण कायद्यातील तरतुदी या केवळ जागेच्या रहिवासी वापराच्या भाडेकरारांसाठीच लागू होत नसून व्यावसायिक व व्यापारी वापराच्या भाडेकरारांसाठीही लागू होतात, असा महत्त्वपूर्ण निर्वाळा मुंबई उच्च न्यायालयाने नुकताच एका प्रकरणाच्या निमित्ताने दिला आहे. त्यामुळे आता केवळ निवासी/रहिवासी वापराच्या भाडेकरारांबाबत नव्हे तर व्यावसायिक व व्यापारी वापराच्या भाडेकरारांतही मालक व भाडेकरू यांच्यातील वादांचा निपटारा हा महाराष्ट्र भाडे नियंत्रण कायद्याच्या कलम ४२ अन्वये राज्य सरकारने नेमलेल्या सक्षम प्राधिकाऱ्यांसमोर होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. अशी प्रकरणे लवादासमोर वर्ग होण्याची आवश्यकता राहणार नाही.**

नवी मुंबईतील निल डेव्हलपर्स यांनी आपल्या पनवेल येथील दोन सदनिका व दोन कार्यालयांची जागा मेसर्स पनवेल मेडिकल रिसर्च सेंटर या रुग्णालयाला २०१३मध्ये भाड्याने दिल्या होत्या. त्यासाठी त्यांनी तीन स्वतंत्र भाडे करारनामे केले होते. हे तीन करारनामे तीन वर्षांसाठी होते. त्यानंतर कंपनीने सामंजस्य करारनाम्याच्या आधारे जागा ताब्यात ठेवण्याची परवानगी रुग्णालयाला दिली. मात्र, काही वाद उद्‌भवल्यास प्रकरण लवादाकडे जाईल, अशी तरतूद त्या सामंजस्य करारनाम्यात ठेवली. एप्रिल-२०२१मध्ये दोन्ही पक्षकारांत वाद निर्माण झाल्यानंतर कंपनीने रुग्णालयाला जागा खाली करण्याबाबत कायदेशीर नोटीस बजावली आणि थकित भाड्याच्या रकमेची मागणी केली. त्यानंतर कंपनीने फेब्रुवारी-२०२२मध्ये पुन्हा नोटीस बजावून सामंजस्य कराराप्रमाणे वाद मिटवण्याचे प्रकरण लवाद म्हणून जिल्हा न्यायालयाच्या निवृत्त न्यायाधीशाकडे सोपवण्याचे सूचित केले. त्यालाही रुग्णालयाकडून प्रतिसाद येत नसल्याचे पाहून कंपनीने उच्च न्यायालयात याचिका केली होती. मात्र, मूळ भाडेकरारात लवाद नेमण्याची तरतूदच नव्हती. अशावेळी केवळ सामंजस्य करारातील तरतुदीच्या आधारे लवाद नेमला जाऊ शकत नाही. तिन्ही करारनामे हे नोंदणीकृत होते. त्यामुळे भाडे नियंत्रण कायद्यातील तरतुदीप्रमाणे हे प्रकरण सक्षम प्राधिकाऱ्याकडे जायला हवे,



असा युक्तिवाद रुग्णालयाने न्या. मनीष पितळे यांच्यासमोर झालेल्या सुनावणीत मांडला आणि कंपनीच्या विनंतीला विरोध दर्शवला. तर भाडे नियंत्रण कायदा हा केवळ रहिवासी वापराच्या भाडेकरारांना लागू होतो. तो जागेच्या व्यावसायिक किंवा व्यापारी वापराच्या भाडेकरारांना लागू होत नाही, असा युक्तिवाद कंपनीने मांडला. त्यामुळे कायद्यातील तरतुदी व विविध कायदेशीर मुद्द्यांचा ऊहापोह करत आणि सर्वोच्च न्यायालयाच्या विविध निवाड्यांचा विचार करत न्या. पितळे यांनी ६ मार्च रोजी आपला निर्णय सुनावताना हा महत्त्वाचा निर्वाळा दिला.

### उच्च न्यायालय म्हणते...

भाडे नियंत्रण कायद्याच्या कलम २४(१)मध्ये निवासासाठी भाड्याने दिलेली जागा, असे म्हटले असले तरी कलम २मध्ये हा कायदा व्यवसाय व व्यापारांसाठीही लागू असल्याचे म्हटले आहे. कायद्याच्या कलम ४२अन्वये भाड्याने दिलेली जागा परत मिळवण्याबाबत विशेष तरतुदी आहेत. त्यामुळे व्यावसायिक वापराची जागा परत मिळवण्यासाठी हा कायदा लागू होत नसल्याचा कंपनीचा युक्तिवाद मान्य होऊ शकत नाही. कलम ४२अन्वये अशा प्रकरणांत आलेल्या अर्जांचा निपटारा करण्याची विशिष्ट प्रक्रिया सक्षम प्राधिकाऱ्यांना घालून दिलेली आहे. तसेच सक्षम प्राधिकाऱ्यांच्या अखत्यारित जाणाऱ्या प्रकरणांत हस्तक्षेप करण्यास कलम ४७ अन्वये दिवाणी न्यायालयांना प्रतिबंध आहे. त्यामुळे हे प्रकरण लवादाकडे जाण्याऐवजी सक्षम प्राधिकाऱ्यांकडे जायला हवे, असे उच्च न्यायालयाने आपल्या निर्णयात नमूद केले.





# माढ्यात पुन्हा राष्ट्रवादी उमेदवार बदलणार?

**अजित उंब्रजकर**

**मतदारसंघाची नव्याने स्थापना होऊन तयार झालेल्या माढा मतदारसंघात एकेकाळी दबदबा असलेल्या राष्ट्रवादी काँग्रेसला आता सुरूंग लागल्याचे दिसत आहे. २००९ आणि २०१४ मध्ये सलग दोन वेळा राष्ट्रवादीने हा मतदारसंघ जिंकला. मात्र गतवेळी हा मतदारसंघ भाजपाने जिंकून राष्ट्रवादीच्या बालेकिल्ल्याला खिंडार पाडले. आता या मतदारसंघात भाजपाने अनेक नेत्यांना पक्षात घेत ताकद वाढवली आहे. त्यामुळे हा मतदारसंघ पुन्हा ताब्यात घेण्यासाठी राष्ट्रवादीला मोठी कसरत करावी लागणार आहे. माढा ताब्यात घेण्यासाठी सलग तिन्हीवेळा उमेदवार बदलणाऱ्या या मतदारसंघात आताही राष्ट्रवादी उमेदवार बदलणार का, याची चर्चा मतदारसंघात सुरू आहे.**

२००९ मध्ये नव्याने माढा मतदारसंघाची निर्मिती झाली. त्यावेळी खुद्द शरद पवार हे निवडणूक रिंगणात उतरले. त्यावेळी अपेक्षेप्रमाणे पवार हे विजयी झाले. २०१४ मध्ये मात्र राष्ट्रवादीने या मतदारसंघातून माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते-पाटलांना संधी दिली. मोदी लाट असतानाही विजयदादांनी हा मतदारसंघ पुन्हा राष्ट्रवादीकडे खेचून आणला. मात्र २०१९ च्या निवडणुकीपूर्वी मोहिते-पाटील हे भाजपमध्ये गेल्याने त्यावेळी राष्ट्रवादीला उमेदवा बदलावा लागला. २०१९ मध्ये राष्ट्रवादीकडून संजयमामा शिंदे यांना उमेदवारी देण्यात आली. मात्र ते विजयाची हॅट्ट्रिक करू शकले नाही. त्यांचा रणजितसिंह निंबाळकरांनी पराभव करत हा मतदारसंघ भाजपाच्या ताब्यात आणला. २००९,२०१४ आणि २०१९ मध्ये राष्ट्रवादीने या मतदारसंघात उमेदवार बदलले. आताही २०२४ मध्ये उमेदवार बदलण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. आता हा मतदारसंघ भाजपाचा बालेकिल्ला बनला आहे. माढा मतदारसंघात येणाऱ्या माळशिरस, माण-खटाव, सांगोला या तीन मतदारसंघात भाजप-सेनेचे आमदार आहेत. तर उर्वरित माढा, फलटण आणि करमाळा या मतदारसंघात राष्ट्रवादीचे आमदार आहेत.






मात्र आता माढा मतदासंघाचे आमदार तथा राष्ट्रवादीचे ज्येष्ठ नेते बबनदादा शिंदे भाजपच्या वाटेवर आहेत. त्यांनी जर भाजपाच रस्ता धरला तर संजयमामा शिंदे यांची भूमिकाही बदलण्याची शक्यता आहे. सध्या राज्यात भाजप-सेनेची सत्ता आहे. त्यामुळे मतदारसंघातील अनेक लहान-मोठे नेते भाजपच्या संपर्कात आहेत. त्यामुळे या मतदारसंघात राष्ट्रवादीची ताकद कमी झाली आहे तर भाजपाची वाढल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे राष्ट्रवादीला या मतदारसंघात विजयासाठी मोठे कष्ट घ्यावे लागणार आहे. उमेदवार शोधण्यापासून पक्षाला रणनिती आखावी लागणार आहे. सध्या पक्षापुढे आ. रामराजे निंबाळकर, सातारा जि.प.चे माजी अध्यक्ष संजीवराजे निंबाळकर आणि माजी आ. दिपकआबा साळुंखे आणि उत्तम जानकर यांची नावे चर्चेत आहेत.

### संजयमामा पुन्हा उभारण्याची शक्यता कमी



आ. बबनदादा शिंदे भाजपमध्ये जाणार असल्याची चर्चा आहे. त्यामुळे त्यांचे बंधू संजयमामा शिंदे यांची अडचण होणार आहे. बबनदादांनी राष्ट्रवादीपासून फारकत घेतल्यास संजयमामाही निवडणुकीच्या तोंडावर मोठा निर्णय घेऊ शकतील, अशीही चर्चा आहे. गत निवडणुकीला त्यांना शेवटच्या पक्षात घेत उमेदवारी देण्यात आली होती. २०१९ मध्ये त्यांनी विधानसभा निवडणूक करमाळ्यातून जिंकली. तेव्हापासून ते करमाळ्यातच जास्त रमल्याचे दिसून येत आहे.

### संजीवराजे निंबाळकर देतील चांगली लढत



राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची स्थापना झाल्यापासून फलटण तालुक्यात ग्रामपंचायती पासून ते विधानसभेपर्यंत एक हाती सत्ता राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडे ठेवण्याचे काम संजीवराजे नाईक निंबाळकर यांनी केले आहे. ते सध्या महाराष्ट्र राज्य खो-खो असोसिएशनचे विद्यमान अध्यक्ष आहेत. फलटण तालुक्यात संजीवराजे नाईक निंबाळकर यांचा चांगला दबदाबा आहे. त्यांनी साताऱ्याचे जि.प. अध्यक्षपदही भूषवले आहे. त्यामुळे ते भाजपच्या उमेदवाराला चांगली लढत देतील, अशी शक्यता वर्तवली जात आहे. त्यांना आ. रामराजे निंबाळकर, आ. दिपक चव्हाण यांची ताकद मिळणार आहे.

### भाजपाच्या अंतर्गत गटबाजीवर असणार लक्ष

राष्ट्रवादीला माढा मतदारसंघात उमेदवार शोधताना भाजपाच्या अंतर्गत गटबाजीवर लक्ष असणार आहे. भाजपाचे विद्यमान खा. रणजितसिंह निंबाळकर आणि मोहिते-पाटील यांच्यात हेवेदावे सुरू आहेत. दोघे प्रत्यक्षात एकमेकांविरूद्ध बोलत नसले तरी शह-काटशहाचे राजकारण सुरू आहे. या प्रकरणावरही राष्ट्रवादीच्या पक्षश्रेष्ठींना लक्ष्य ठेवावे लागणार आहे.

# 'ती' पायवाट अधिक गडद, तर 'ते' नेतृत्व 'जोडगोळी'कडे

**संजय आठवले**

माजी आमदार राजन पाटील भाजपामध्ये जाणार? या विधानाला गोव्याच्या मुख्यमंत्र्यांनी दिलेल्या भेटीमुळे निश्चितपणे पुष्टी मिळाली असून मोहोळ विधानसभा मतदार संघात आगामी काळात राष्ट्रवादी काँग्रेसचे नेतृत्व राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रवक्ते व सोलापूर जिल्हा परिषदेचे माजी सदस्य उमेश पाटील व रमेश बारसकर या जोडगोळीकडे असणार.? अशी चिन्हे दिसत आहेत







मोहोळ विधान सभा मतदार संघात माजी आमदार राजन पाटील यांनी एकहाती सत्ता ठेवली होती. मागील तीस वर्षात त्यांनी त्यांची मतदार संघावरील पकड ढिली होवू दिली नाही. परंतु मोहोळ विधानसभा मतदार संघ अनुसूचित जातीसाठी राखीव झाल्यापासून त्यांना त्यांच्या मतदार संघात दुसऱ्याला निवडून आणावे लागते व त्यांच्याकडून मतदार संघाची कामे करून घ्यावी लागतात. हे जरी खरे असले तरी त्यांनी मतदार संघात निवडून आणलेल्या आमदाराने आपले बस्तान तालुक्यात किंवा मतदार संघात बसवू नये. त्यांचा गट तयार होवू नये त्यांचे कार्यकर्ते तयार होवू नये जे काय करणार ते आम्हीच करणार? हे त्यांनी वारंवार उमेदवार बदलून (पक्षाने दिलेला) दाखवून दिले आहे. वारंवार त्यांच्या सारखा एकच उमेदवार तीन चार टर्म असता तर त्यांना जड गेले असते. सहा सात महिने मनसोक्त काम केलेले व अपहार प्रकरणी जेलमध्ये गेलेले रमेश कदम यांनी मागील निवडणुकीत जेलमध्ये असतानाही २५ हजार मते मिळवली होती हे यावरून दिसून येते. असो. परंतु सत्ता नसतानी दुसऱ्या आमदाराचा गट होवू नये याची खबरदारी घेतली, हे मात्र निश्चित

मागील साधारण एक वर्षापासून माजी आमदार राजन पाटील हे भाजपामध्ये जाणार ही चर्चा चांगलीच रंगली आहे. अन गोव्याचे मुख्यमंत्री सावंत यांनी अनगर येथे त्यांच्या निवासस्थानी घेतलेल्या भेटीचा खरा तपशील बाहेर आलाच नाही परंतु त्याच भाजपामध्ये येण्याचे आमंत्रण अन त्यांचे चिरंजीव बाळराजे पाटील यांचे सूचक हास्य बरेच सांगून गेले. जनता अन कार्यकर्ते काय समजायचे ते समजून घेतले. भाजपाच्या कार्यकत्यांची आणि माजी आमदार राजन पाटील यांच्या समर्थकांची जवळीक झालेली दिसून येते. राष्ट्रवादी काँग्रेसचे राजन पाटील समर्थक भाजपाच्या कार्यकर्त्यांना नमस्कार घालताना जय श्रीराम म्हणतात तर काही जणांनी त्याचे पुढे जात त्यांच्या त्यांच्या मोबाईलला नमस्ते सदा वत्सले मातृभूमे। त्वया हिंदू भूमे सुखं वर्धितोहम। महामंगले पुण्य भूमे त्वदर्थे। पतत्वेष कायो नमस्ते नमस्ते।। ही संघाची प्रार्थना ठेवताना दिसतात. या व इतर घटना बघता अगदी किरकोळ काम सुद्धा हे सर्व कार्यकर्ते राजन पाटील यांना विचारल्या शिवाय करत नाहीत मग जय श्रीराम आणि संघ प्रार्थना यांचा उल्लेख करणे अशक्यच . पण ते त्यांनी केले आहे. त्यामुळे माजी आमदार राजन पाटील आणि त्यांचे चिरंजीव यांची भाजपाची पायवाट अधिकच गडद झाल्याचे दिसून येते आहे अशी चर्चा सुरू आहे.

माजी आमदार राजन पाटील यांच्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे मोहोळ विधानसभा मतदार संघाचे नेतृत्व राष्टवादी काँग्रेसचे प्रदेश प्रवक्ते उमेश पाटील याच्याकडे असणार ? व त्याचे सहकारी रमेश बारसकर मानाजी माने,संजय विभूते, राहुल क्षीरसागर हे काम पहातील, अशी चिन्हे दिसत आहेत.

# सभापतीपदानंतर आता नगराध्यक्षपदाच्या स्पर्धेत?

**सचिन अपसिंगकर**

बार्शी तालुक्याच्या राजकारणात आमदार राजाभाऊ राऊत गेली २८ वर्षे सक्रिय आहेत. त्यांनी आजपर्यंत एकतर्फी संख्याबळाने दोन वेळा नगरपालिकेची सत्ता ताब्यात घेतली. पंचायत समितीवर चारवेळा आपल्या गटाचे वर्चस्व ठेवले. दोन वेळा बार्शीचे विधानसभेत प्रतिनिधीत्व केले. त्यांच्या समर्थकांनी दोन वेळा नगराध्यक्ष पदाच्या थेट लढती जिंकल्या. पाच वर्षापूर्वी त्यांचे पुत्र रणवीर राऊत राजकारणात उतरले. आता लवकरच राऊत गटाला नगरपालिकेच्या निवडणूकांना सामोरे जायचे आहे. नगराध्यक्ष पदासाठी थेट लढत होण्याची संधी आहे. त्यामुळे राऊत गटाचे नगराध्यक्षपदाचे उमेदवार रणवीर राऊत असणार का याची उत्सुकता लागली आहे.



बार्शीमध्ये महाविद्यालयीन जीवनात रणवीर राऊत यांनी विद्यापीठ प्रतिनिधी पद पटकावले. त्यांच्याकडे संघटन कौशल्य आहे. त्यांना राजकारणाची आवड आहे, हे त्यांनी सिध्द केले. त्यातून त्यांना जिल्ह्यातील मोठी उलाढाल असलेल्या बार्शी बाजार समितीच्या सभापतीपदाची संधी मिळाली. हे पद भूषवताना रणवीर राऊत यांनी नेतृत्व गुण सिध्द केले. आज तालुक्यात त्यांना मानणाऱ्या युवा कार्यकर्त्यांची संख्या मोठी आहे. तालुक्याच्या राजकारणात आमदार राऊत यांचे वर्चस्व आहे. आता लवकरच राऊत गटाला नगरपालिकेच्या निवडणुकांना सामोरे जायचे आहे. नगराध्यक्ष पदासाठी थेट लढत होण्याची संधी आहे तसेच नगराध्यक्षपद सर्वसाधारण देखील होऊ शकते. रणवीर राऊत यांना बाजार समितीच्या सभापती पदाचा अनुभव आहे. नगराध्यक्ष पदाची थेट लढत किंवा नगरसेवकातून नगराध्यक्षपद निवडण्याची परिस्थिती निर्माण झाली तर आजमितीस आमदार राऊत यांच्या गटाचे पारडे जड आहे. राज्यात भाजपाचा वरचष्मा असलेले सरकार आल्यानंतर राजकीय समीकरणे बदलली आहेत. राऊत गटाचे नगराध्यक्षपदाचे उमेदवार रणवीर राऊत असू शकतात. शहरातील बाजार समितीच्या माध्यमातून जोडल्या गेलेल्या व्यापारी वर्गाचा त्यांना पाठींबा मिळू शकतो तसेच रणवीर राऊत यांची सातत्याने असलेली सक्रियता ही त्यांची जमेची बाजू आहे.

### पाठबळ निर्णायक ठरणार



**आमदार राऊत यांना आगामी विधानसभा निवडणुकीच्या दृष्टीने मोर्चेबांधणी करावी लागणार आहे. या पार्श्वभूमीवर त्यांचा राजकीय वारसदार असलेल्या रणवीर राऊत यांना बाजार समितीच्या सभापतीपदाच्या पाठोपाठ आता नगराध्यक्षपदाच्या स्पर्धेत उतरायची संधी मिळते का याची बार्शीकरांमध्ये मोठी चर्चा आहे. आमदार राऊत यांच्या गटाने नगरपालिकेत मोठी विकास कामे केलेली आहेत. आमदार राऊत यांना राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिलेले उघड पाठबळ देखील निर्णायक ठरू शकते.**

# बुरा न मानो होली है...

**डी.एस.गायकवाड**

● खा. रणजितसिंह नाईक निंबाळकर
▶▶ पुन्हा खासदार होण्यासाठी काय काय करावे लागेल?

● खा. जयसिध्देश्वर महाराज
▶▶ माझ्या आध्यात्मिक कामामुळे मला वेळ देता येत नाहीयेय...समजून घ्या सर्वांनी

● आ.शहाजीबापू पाटील
▶▶ सध्या सगळं ओके आहे पण शेकाप चे आव्हान कसे परतवून लावायचे?

● आ. रणजितसिंह मोहिते-पाटील
▶▶ बरं झालं भाजपमध्ये गेलो नाही तर.....

● आ.बबनदादा शिंदे
▶▶ जाऊ का नको,जाऊ का नको..भाजपा मध्ये रणजितच करियर घडलं पाहिजे

● धैर्यशील मोहिते-पाटील
▶▶ आता भाजपाच सर्वस्व... भाजपासाठी काय पण..

● आ.प्रशांत परिचारक
▶▶ पक्षाने टाकलेल्या माढा लोकसभेच्या जबाबदारीमुळे पंढरपूर मंगळवेढ्याकडे दुर्लक्ष होऊ नये म्हणजे झालं

● आ.समाधान आवताडे
▶▶ प्रशांत मालकाला नाराज करून चालणार नाही

● आ.यशवंत माने
▶▶ पुढच्या वेळेस राजन मालकांनी संधी नाही दिली तर अकलूज करांना जवळ करावे लागेल

● आ.सचिन कल्याणशेट्टी
▶▶ दोन्ही देशमुख यांना सोबत घेऊन सोलापूर लोकसभेसाठी काम दाखवावेच लागेल.. नाहीतर महाराजांचा आशीर्वाद आहेच

● आ.राजेंद्र राऊत
▶▶ फडणवीसांचा विशेष लोभ टिकवायचा मग कोणी पण येऊ द्या मैदानात

● माजी आ.दिलीप सोपल
▶▶ कधी एकदाची विधानसभा निवडणूक जाहीर होते त्याच प्रतीक्षेत

● राजाभाऊ सरवदे
▶▶ सोलापूर लोकसभा निवडणुकीची घोषणा नेहमीप्रमाणे यंदाही हवेत विरून जाऊ नये एवढीच अपेक्षा...

● आ.संजयमामा शिंदे
▶▶ भाजपात न गेल्याचा पश्चाताप होतोय? आता जाता पण येईना आणि राष्ट्रवादी पक्षासाठी काम पण करता येईना(कारण फडणवीस जिल्ह्याचे प्रभारी)

● उत्तमराव जानकर
▶▶ कितीदा नव्याने तुला (आमदारकीला) आठवावे, डोळ्यातील पाणी नव्याने वहावे

● डॉ धवलसिंह मोहिते पाटील
▶▶ देणार आहे मी वेळ काँग्रेसला.. थोडा धीर धरा...

● आ. प्रणिती शिंदे
▶▶ सोलापूर लोकसभा जिंकावीच लागेल तरच केंद्रात किंमत...

● आ.राम सातपुते
▶▶ (स्वप्न)अलीकडील काळात दुसऱ्या टर्मचा देखील... आमदार झाल्यासारखं वाटतंय

● बळीराम काका साठे
▶▶ राष्ट्रवादी मलाच दचका देते तर मी का काम करू....???

● राजन पाटील
▶▶ बोलणं झालय सगळं.. येतोय भाजपमध्ये... अचूक वेळ तरी येऊ द्या की राव..

● सुभाष देशमुख
▶▶ मुलाच्या राजकीय करिअरची चिंता संपता संपत नाही.



# एकला चलो



**सूरज सरवदे**

पंढरपूरच्या राजकारणात परिचारक यांचा सक्षम गट म्हणून ओळखला जातो. स्व. भारत भालके यांनी परीचारकांच्या गडाला छेद देत ३ वेळा आमदारकी पटकावली आहे. एक वेळा प्रशांत परिचारक आणि दुसऱ्या वेळी स्व. सुधाकरपंत परिचारक यांचा त्यांनी पराभव केला होता. त्याच धर्तीवर विठ्ठल सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष अभिजित पाटील हे आता पंढरपूरच्या राजकारणात उतरले आहेत. नुकताच त्यांनी नगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पंढरपुरातील काही भागांचा दौरा केला आहे. त्यावरून त्यांची एकला चलो रे भूमिका स्पष्ट होतेय.

विठ्ठल सहकारी साखर कारखान्याच्या निवडणुकीच्या माध्यमातून अभिजित पाटील यांचा पंढरपूर तालुक्याच्या राजकारणात प्रवेश झाला आहे. सत्ताधारी भालके गटाची १८ वर्षांची सत्ता काबीज करताना सत्ताधारी भालके आणि युवराज पाटील यांच्याशी अभिजित पाटील यांना लढावे लागले होते. त्यांनी कोणालाही सोबत न घेता विठ्ठल मध्ये सत्ता संपादन केली.

भारत भालके यांच्या निधनानंतर परिचारक यांना विरोध करणारा सक्षम विरोधक त्यांच्या समोर राहिला नाही. नागरिकांना अनेक समस्या भेडसावत आहेत पण आवाज उठवणारे नेतृत्व नाही. स्व भारत भालके यांनी जनसंपर्काच्या जोरावर निवडणुका जिंकल्या. त्या उलट भगीरथ भालके यांचा जनसंपर्क राहिला नाही. तसेच मनसेचे नेते दिलीप धोत्रे जनतेत जाण्याचा प्रयत्न करत आहेत मात्र जनता त्यांना कितीपत स्वीकारेल? हा मोठा प्रश्न आहे.

अभिजित पाटील यांनी विठ्ठल कारखान्यात सत्ता काबीज केल्यानंतर पूर्वीच्या सत्ताधाऱ्यांनी न दिलेले ऊसाचे बिल दिले. त्यामुळे शेतकऱ्यांचा विश्वास संपादन केला आहे. विठ्ठलच्या सभासदांना शेतकऱ्यांना २५०० रुपये प्रति टन भाव जाहीर केल्यामुळे जिल्ह्यातील इतर साखर कारखानदारांना सुद्धा २५०० रुपयांच्या पुढे दर द्यावा लागला आहे.

विठ्ठलमध्ये सत्तांतर घडल्यामुळे सर्वसामान्य शेतकऱ्यांना प्रति टन ३००-४०० रुपयांचा फायदा मिळू लागला आहे. यंदाच्या हंगामात विठ्ठल आणि सांगोला कारखान्याने मिळून १० लाख मॅट्रिक टन ऊसाचे गाळप केले आहे. बबनदादा शिंदे, परिचारक यांच्यानंतर सोलापूर जिल्ह्यात पहिल्यांदाच उतरलेले अभिजित पाटलांनी गाळपात चांगली आघाडी घेतली आहे.

ज्या पद्धतीने भारत भालके यांनी आमदारकी मिळवल्यानंतर सर्वांना एकत्र केले. विठ्ठल परिवार एकसंघ केला त्याच पध्दतीने अभिजित पाटील देखील सर्व सत्ता काबीज केल्यानंतर परिवारातील नेत्यांना एकत्र करतील असे बोलले जात आहे.

सहकारी शिरोमणी वसंतराव काळे सहकारी साखर कारखान्याची निवडणूक लढवण्याची तयारी सुरू झाली आहे. तसेच नगरपालिका, पंचायत समिती, जिल्हा परिषदेच्या निवडणुकामध्ये अभिजित पाटील यांचे एकला चलो ची भूमिका असणार आहे.

भारत भालके यांच्या निधनानंतर परिचारक विरोधकांची पोकळी निर्माण झाली आहे. रीचेबल आणि विश्वासार्ह नेतृत्व नसल्यामुळे पोकळी भरून काढणारा नेता नाही. विठ्ठलच्या यशानंतर अभिजित पाटील यांना जनतेतून मोठा रेटा आहे. नगरपालिका, जिल्हा परिषद, पंचायत समितीच्या निवडणुका लढवा असा कार्यकर्त्यांनी आग्रह धरला आहे. मात्र अभिजित पाटील यांनी एकला चलो ची भूमिका घेतल्यामुळे मनसे नेते दिलीप धोत्रे यांच्यासह सत्ताधाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत.